(आधुनिक)

ज्ञानमोदक

(गोरावबिनंदनकुमार)

जगाद्धितेच्छु, पुणे

१ फेब्रु. १८८७

पृष्ठे : ५९

आकार : ८½" × ५½"

891.461
V Gos/Gya
50476

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

S.N.D.T. WOMEN'S UNIVERSITY
LIBRARY

25 APR 1972

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीसच्चिदानंदायनमः ॥ जयजयश्रीगणना
यका ॥ मंगळमूर्तिविनायका ॥ धर्मार्थकाममोक्षदायका ॥ नमोतुज ॥ १ ॥ सिद्धि
बुद्धिपतिसर्वोत्तमा ॥ स्वभक्तकामकल्पद्रुमा ॥ चिंतामणीअनंतधामा ॥ नमोतुज
॥ २ ॥ एकदंतालंबोदरा ॥ भालचंद्रामोरेश्वरा ॥ धुंढिराजाविश्वंभरा ॥ नमोतुज
॥ ३ ॥ सकळविघ्नसंकटनाशना ॥ हेरंबातापत्रयनिवारणा ॥ अनन्यनिजभक्तसंर
क्षणा ॥ नमोतुज ॥ ४ ॥ जयजयविद्याप्रकाशका ॥ जयजयअज्ञाननाशका ॥
अनंतकोटिब्रह्मांडनायका ॥ नमोतुज ॥ ५ ॥ तूंचिरेणुकाकुळदेवता ॥ गणेशातूंचि
नागाईमाता ॥ तूंचिगोसावीनामेंपिता॥नमोतुज ॥६॥ तूंचिसद्गुरुरूपगणेशा ॥ स्वा
मीगोपाळाश्रमवेशा॥सच्चिदानंदास्वप्रकाशा॥नमोतुज ॥७॥सद्गुरुगणेशापरात्परा ॥
सद्गुरुगणेशानिर्विकारा ॥ सद्गुरुगणेशासर्वार्थधरा ॥नमोतुज ॥८॥ सद्गुरुगणेशानिर्गु
णा॥ सद्गुरुगणेशासगुणा ॥ सद्गुरुगणेशाचैतन्यघना ॥ नमोतुज ॥९॥ सद्गुरुगणेशा
निरुपमा ॥ सद्गुरुगणेशानिःसीमा ॥ सद्गुरुअरूपाअनामा ॥ नमोतुज ॥ १० ॥
सद्गुरुगणेशाअचला ॥ सद्गुरुगणेशाअमला ॥ सद्गुरुगणेशागोपाला ॥ नमोतुज
॥ ११ ॥ भक्तताराव्यागणपती ॥ धरिलीगोपाळाश्रमआकृती ॥ आतामजलाहेचि
गुमती ॥ अवयव ॥ १२ ॥ प्रसन्नतातेचिशुंडासरळ ॥ ज्ञानविज्ञानगंडयुगुळ ॥ लु

50476

ब्धहोतीमुमुक्षुअलिकुळ ॥ तयेठाईं ॥ १३ ॥ अखंडनिजात्मश्रवण ॥ निगमागम
द्वाराकर्ण ॥ तेचितुझेदोन्हीकर्ण ॥ विराजती ॥ १४ ॥ शुद्धबोधाचातीक्ष्णबहुत ॥
कैसाझळकतोएकदंत ॥ सहजसुखअखंडित ॥ डुल्लसीतूं ॥ १५ ॥ सच्चिदानंद
पणें ॥ सकळविश्वहेंदेखणें ॥ तेचिअभेदत्वेंपूर्ण ॥ तिन्हीनेत्र ॥ १६ ॥ चिदावका
शअपार ॥ अंतःकरणतदाकार ॥ तेंचितुझेंलंबउदर ॥ विस्तारिलें ॥१७ ॥ त्याव
रीअत्यंतसुंदर ॥ सोहंभावाचाफणिवर ॥ कैसाशोभेनिरंतर ॥ सहजची॥ १८॥
चतुर्विधआश्रमप्रचंड ॥ हेचिचारीभुजादंड ॥ यथाविधिजेअखंड ॥ विराजती॥१९॥
सन्मार्गाचापाश ॥ सद्भावाचाअंकुश ॥ ऐसींआयुधेंविशेष ॥ धरिसीतूं ॥ २० ॥
तृप्तकरायासकळिक ॥ जेआपलेभक्तलोक ॥ घेतलाब्रह्मानंदमोदक ॥ निजहस्तीं
॥ २१ ॥ प्रपंचपरमार्थजाण ॥ हेतुझेदोन्हीचरण ॥ उभयऐक्यत्वचालणें ॥ घडेतु
ज ॥ २२ ॥ जवळीभुक्तिआणिमुक्ति ॥ त्य चिसिद्धिबुद्धिशोभती ॥ अभयवरदाग
णपती ॥ गुरुवर्या ॥ २३ ॥ स्वानुभवाचाउंदिर ॥ त्यावरीबैससीनिरंतर ॥ अंगीं
निरहंकारसिंदूर ॥ घबघबीत ॥ २४ ॥ कैसेंवैराग्याचेंवसन ॥ दिव्यझळकेविराज
मान ॥ तैसींअनेकभूषणें ॥ कायवर्णूं ॥ २५ ॥ शुद्धसत्त्वाचामुगुट ॥ सत्कर्मरत्न
लखलखाट ॥ स्वप्रकाशनिश्चयाचाप्रगट ॥ भाळींचंद्र ॥ २६ ॥ सुखदुःखसमान॥

तींचिकुंडलेंशोभायमान ॥ पुरुषार्थाचींकंकणें ॥ चौहस्तीं ॥ २७ ॥ शमदमादिष
ट्टा॥तेंचिषट्टोणपदक ॥ नवविधारत्नाचीअमोलिक ॥ माळागळां ॥२८ ॥ कटींशोभे
मेखळाथोर ॥ पांईवाजतीस्तवनाकार ॥ भक्तभावाच्यासुंदर ॥ घागरिया ॥ २९॥
मैत्रीकरुणामुदिता ॥ आणिउपेक्षाभगवंता ॥ ऐशाशुभवासनातत्वतां ॥ मुद्रिका
त्या ॥ ३० ॥ अमानित्वादिसाधनें ॥ तींचिनानापरीसुमनें ॥ सत्कीर्तिकस्तुरीसंपू
र्ण ॥ मघमगी ॥ ३१ ॥ केवळजेंसर्वाधिष्ठान ॥ पूर्णसुखाचेंसदन ॥ तेथेंक्रीडसी
निशिदिन ॥ समरसें ॥ ३२ ॥ सन्निधानकामधेनुउन्मनी ॥ अचिंत्यबोधचिंताम
णी ॥ निर्विकल्पतोअंगणीं ॥ कल्पवृक्ष ॥ ३३ ॥ क्रोधादिदैत्यसंहारिसी ॥ ज
न्ममृत्यादिविघ्नेंहरसी॥ संशयसंकटातेंनिवारिसी॥क्षणमात्रें॥३४॥जेव्हातुझीकृपाहो
य॥ तेव्हांअज्ञानदैन्यजाय ॥ मुक्तिलक्ष्मीघराये ॥ अनायासीं ॥३५॥ ऐसातूंसद्गुरु
मंगळधामा ॥ बोलवेनातुझामहिमा ॥ गणेशागोपाळाश्रमा ॥ नमोतुज ॥ ३६ ॥
ऐसीकरितांस्तुति ॥ तेणेंसंतोषलागणपति ॥ प्रसन्नमंगळमूर्ति ॥ सद्गुरुरूपें॥३७॥
कृपेनेंमस्तकींहातठेविला ॥ म्हणेआतांकरावेंग्रंथाला ॥ तुझामाझाजोसंवादझाला॥
तोचिबोलावा ॥ ३८ ॥ जोकरिशीलतूंग्रंथ ॥ तोहोईलपरोकारार्थ ॥ हेंमाझेंवाक्य
नव्हेव्यर्थ ॥ निश्चयेंसी ॥ ३९ ॥ ऐसादेऊनिपूर्णवर ॥ बुद्धींतप्रवेशलागणेश्वर ॥

बोलवीनानाशब्दाकार ॥ वाग्देवता ॥ ४० ॥ त्याचाप्रसादलाधतां ॥ द्वैतभ्रांति गेलीआतां ॥ जनींवनींपाहतां ॥ गजानन ॥ ४१ ॥ विश्वींविश्वात्माएकअसतां ॥ श्रोतावक्ताअनुमोदिता ॥ निंदकआणिस्तविता ॥ भेदकैंचा ॥ ४२ ॥ ज्ञानमोदकग्रंथमिषें ॥ गुरुआणिशिष्यवेषें ॥ स्वयेंप्रगटकेलागणेशें ॥ आपलामहिमा ॥ ४३ ॥ केवळब्रह्मानंदसागरीं ॥ स्फुरलीवाग्देवतालहरी ॥ हेंअभिन्नत्वेंनिर्धारीं ॥ जाणती संत ॥ ४४ ॥ गणेशगोसावीनंदनसंवाद ॥ जेथेंउपनिषदर्थविशद ॥ परिसतांजो डेपरमानंद ॥ श्रोतयांसी ॥ ४५ ॥ येथूनसंपलेंमंगळाचरण ॥ जेंबोलविलेंगजाननें ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ४६ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे ॥ गणेशगोसावीनंदनसंवादे मंगलाचरणनिरूपणं नाम प्रथमोऽध्यायः ॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥ ओवीसंख्या ॥ ४६ ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ आतांसंतासींनमस्कार ॥ जेपूर्णकृपेचेसागर ॥ करितीदीनांचा उद्धार ॥ निजसामर्थ्यें ॥ १ ॥ कायावाचाआणिमन ॥ जयांसींगेलियाशरण ॥ तत्काळपाविजेपूर्ण ॥ परब्रह्म ॥ २ ॥ केवळआनंदाचियामूर्ती ॥ जेज्ञानविज्ञानचक्रवर्ती ॥ त्यांपुढेबोलावयास्फूर्ती ॥ कैंचीमज ॥ ३ ॥ त्यांहीज्यालाआपुलेंह्मणविलें ॥ त्याचेंभलतसेंवाटेचांगलें ॥ त्यांसीभक्तीनेंजेंअर्पिलें ॥ तेंस्वीकारिती ॥ ४ ॥ हेंअं

तींबरवेंकळलें ॥ म्हणोनिनिर्भयमनजालें ॥ सहजचिबळदुणावलें ॥ बोलावयासी ॥ ५ ॥ मीकेवळआहेंबुद्धिहीन ॥ परिसंताचीआज्ञाप्रमाण ॥ त्यांच्यासामर्थ्येंनिरूपण ॥ करूंकांहीं ॥ ६ ॥ जाणूनिसद्गुरूचाअंकित ॥ सहजकृपाकरितीलसंत ॥ ऐसाचित्तींवाटतोबहुत ॥ भरंवसा ॥ ७ ॥ त्यांचेंत्यांचेंपुढेंबोलतां ॥ कायसांकडेंमजआतां ॥ अवघीत्याकृपेचीसत्ता ॥ वदवीतसे ॥ ८ ॥ देवभक्तांचासंवाद ॥ जेथेंकेवळब्रह्मानंद ॥ तोऐकतांविशद॥फिटेभ्रांति ॥ ९ ॥ केवळमंगळमूर्तीप्रति ॥ गोसावीनंदनकरीविनंती ॥ तेसावधहोऊनियाश्रोतीं ॥ परिसावी ॥ १० ॥ म्हणेश्रीगणेशगोपाळाश्रमा ॥ स्वामीसद्गुरुकैवल्यधामा ॥ कृपाकरूनिसंसारभ्रमा ॥ निवारावें ॥११॥ संसारबंधनींमीपडलों ॥ तेणेंअत्यंतदुःखापावलों ॥ म्हणोनिशरणआलों ॥ तुजलागीं ॥ १२ ॥ आपुल्याभजनींलावावें ॥ संसारावेगळेंकरावे ॥ हेंचिकृपाकरूनिद्यावें ॥ देवामज ॥ १३ ॥ गणेशातुझियाभजनाविना ॥ नावडतीविषयभोगनाना ॥ यांच्यासंगेंसुखउपजेना ॥ अणुमात्र ॥ १४ ॥ देवामींपरमअपराधी ॥ पावलोंबंदिशाळादेहबुद्धी ॥ तृष्णाशृंखळादयानिधि ॥ पडलीपाईं ॥ १५ ॥ कामक्रोधादिकमोकळ ॥ भोंवतालेदुष्टचांडाळ ॥ इकडेतिकडेएकपळ ॥ हालोनेदी ॥ १६ ॥ भ्रांतिगर्तेमध्येंघालिती ॥ आधिव्याधिफोकाट्यामारिती ॥ नानाकर्मभो

गपाशींबांधिती ॥ बळकट ॥ १७ ॥ लोटतीविक्षेपदगडावरी ॥ तेणेंचूर्णमीजालों भारी ॥ चौऱ्यांशीलक्षदारोदारीं ॥ फिरविती ॥ १८ ॥ विषयकुसंगींबैसविती ॥ कांहींउपजेनाविश्रांती ॥ रात्रंदिवसलागलीचित्तीं ॥ तळमळ ॥ १९ ॥ ऐशादारुणसंसारयातना ॥ आतांमजलासोसवेना ॥ कोणनिरसीलगजानना ॥ तुजवीण ॥ २० ॥ आपुलाअन्यायबोलूंकिती ॥ जरीतुझीसेवामजघडती ॥ तरीकष्टीकांहोतोंगणपती ॥ जन्ममरणें ॥ २१ ॥ तुझेंनामपतितपावन ॥ बोलतीवेदशास्त्रेंपुराणें॥ म्हणोनिआलोंशरण ॥ तुजलागीं ॥ २२ ॥ भवबंधनापासोनआतां ॥ मुक्तकरावें भगवंता ॥ हेंचिमागणेंसद्गुरुनाथा ॥ गणाधीशा ॥ २३ ॥ ऐसेंनिजभक्ताचेंवचन ॥ ऐकोनिसद्गुरुगजानन ॥ अंतरींकळवळलापूर्ण ॥ दयासिंधू ॥ २४ ॥ म्हणेमाझा निजभक्त ॥ जाणूनिअनुतापयुक्त ॥ आतांकरीनतुजमुक्त ॥ क्षणमात्रें ॥ २५ ॥ जेणेंतुटेलसंसारबंधन ॥ ऐसेंसांगेनब्रह्मज्ञान ॥ तेणेंपावशीलसमाधान ॥ निश्चयेंसी ॥ २६ ॥ जेंकेवळश्रुतिशास्त्रांचेंसार ॥ सर्वसाधनाचेंविश्रांतिघर ॥ त्याचीप्राप्तिजालियासंसार ॥ कैंचामग ॥ २७ ॥ उपदेशिलेंतुझ्यापूर्वजांसीं ॥ मुरारीविनायकगोसांवियासीं॥तेंमीसांगतोंतुजपासी॥ब्रह्मज्ञान॥२८॥गणेशपुराणीगणेशगीतेसी॥ उपदेशिलेंवरेण्यराजासी॥तेंमीसांगतोतुजपासी॥ब्रह्मज्ञान॥२९॥वारीजन्ममृत्युजरा

व्याधीसी॥निरसीनानादुःखेदोषासी॥तेंमीसांगतोंतुजपासी॥ब्रह्मज्ञान॥३०॥ तोडीसं
सारबंधनासी ॥ जेणेंपावशीपरमसुखासी ॥तेंमीसांगतोंतुजपासी॥ब्रह्मज्ञान ॥३१॥
सवतीर्थस्नानाच्यापुण्यराशी ॥ जेणेंजोडशीलरेनिश्चयेंसी॥ तेंमीसांगतोंतुजपासी॥
ब्रह्मज्ञान ॥ ३२॥ पृथ्वीदानाचेंफळयेहातासी ॥ असंख्ययज्ञघडतीअनायासीं ॥ तें
मीसांगतोंतुजपासी ॥ ब्रह्मज्ञान ॥ ३३ ॥ तेहतीसकोटीदेवसंतोषी ॥ जेणेंउद्धरेसर्व
पितृराशि ॥ तेंमीसांगतोंतुजपासी॥ब्रह्मज्ञान ॥३४॥ जेणेंपूज्यहोसीत्रैलोक्यासी॥
ज्याचामहिमानकळेकोणासी ॥ तेंमीसांगतोंतुजपासी ॥ ब्रह्मज्ञान ॥ ३५ ॥ ऐसें
सद्गुरुगणेशाचेंवचन ॥ ऐकोनियागोसावीनंदन ॥ पावूनिपरमसमाधान ॥ लागे
चरणा ॥ ३६ ॥ म्हणेजयजयसर्वोत्तमा ॥ सद्गुरुगोपाळाश्रमा ॥ जाणविलाब्रह्म
ज्ञानमहिमा ॥ अद्भुतजी ॥ ३७ ॥ आतांब्रह्मज्ञानप्राप्तिकरावें ॥ संसारापासोनि
सोडवावें ॥ ऐसेदेवाप्रतिभक्तिभावें ॥ विनवितसे ॥ ३८ ॥ संपलेंद्वितीयप्रकरण॥
ज्यामध्येंअनुतापनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावीनदन ॥ यथामतीं ॥ ३९ ॥
इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे गणेशगोसावीनंदनसंवादे अनुतापनिरूपणंनामद्वितीयप्र
करणंसमाप्तम् ॥ २ ॥ ओंवीसंख्या ॥ ३९ ॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ जोपरमसुखाचासागरु ॥ गोपालाश्रमरूपीसद्गुरु ॥ करीतत्का

लदीनाचाउद्धारु ॥ गणाधीश ॥ १ ॥ नित्यशुद्धबुद्धमुक्तनिर्विकारु ॥ सर्वोपाधिशू
न्यसर्वाधारु ॥ तोगोपालाश्रमरूपीसद्गुरु ॥ गणाधीश ॥२॥ जोपूर्णज्ञानाचादिनक
रु ॥ निरसीअविद्याभ्रमअंधकारु ॥ तोगोपालाश्रमरूपीसद्गुरु ॥ गणाधीश ॥३॥
जोसंसारसागरींचातारु ॥ कोण्हासीनकळेत्याचापारु ॥ तोगोपाला० ॥ गणाधीश
॥४॥ ज्यालास्तवितांभागलाफणिवरु ॥ तयाचेंवर्णनमींकायकरुं ॥ तोगोपालाश्रम
रूपीसद्गुरु ॥ गणाधीश ॥५॥ वेदांअवाच्यअसेपरात्परु ॥ केवळदयाघनपरमेश्वरु॥
तो० ॥ गणाधीश ॥ ६ ॥ लीलाविग्रहीधन्यअवतारु ॥ जोनिजभक्ताकामकल्पत
रु ॥ तो० ॥ गणाधीश ॥ ७ ॥ म्हणेगोसावीनंदनासावधान ॥ ऐकतुजसांगतोंब्र
ह्मज्ञान ॥ हेंपरमगौप्यबोलोंनयेजाण ॥ कोणापासीं ॥ ८ ॥ जोअधिकारीअसेल
पूर्ण ॥ त्यासींउपदेशावेंब्रह्मज्ञान ॥ आतांअधिकारियाचेंलक्षण ॥ ऐकावें ॥ ९ ॥
अधिकारीम्हणोंनयेतयाला ॥ पूर्णअपरोक्षज्ञानजयाला ॥ जाणऐशाअत्यंतज्ञानि
याला ॥ श्रवणकाय ॥ १० ॥ ज्याचानिःशेषसंशयफिटला ॥ सर्ववासनेचाक्षयजा
ला ॥ जाणऐशाअत्यंतज्ञानियाला ॥ श्रवणकाय ॥११॥ ज्याशरीरेंप्रवर्तावेंसाधना
ला ॥ त्याशरीराचेंभाननाहींत्याला ॥ जा० ॥ श्रवणकाय ॥ १२ ॥ ऐकावेंज्यापर
मार्थाला ॥ तोअर्थरूपचिहोऊनिठेला ॥ जाणऐशाअत्यंतज्ञानियाला ॥ श्रवणका

य ॥ १३ ॥ ज्याचादेहाभिमानगळाला ॥ विदेहपणेंस्वयेंसंचला ॥ जाण० ॥ श्रव
णकाय ॥ १४ ॥ आपणावांचूनिनेणेद्वैताला ॥ मिथ्याबंधमोक्षभ्रमगेला ॥ जाणऐ
शाअत्यंतज्ञानियाला ॥ श्रवणकाय ॥ १५ ॥ स्वानुभवेंसमाधानपावला ॥ जोपू
र्णब्रह्मानंदेंतृप्तजाला ॥ जाणऐ० ॥ श्रवणकाय ॥ १६ ॥ जोपूर्णज्ञानेंजीवन्मुक्त
समर्थ ॥ तयालाश्रवणाचाकायअर्थ ॥ पैलपारजालियानौकाव्यर्थ॥जैसीबापा॥१७॥
भोजनजालियापाककरणें ॥ ग्रामपावल्यामार्गचालणें ॥ तैसेंअत्यंतज्ञानियालाश्रव
ण ॥ व्यर्थकाय ॥ १८ ॥ यास्तवअनधिकारीपूर्णज्ञानी ॥ आणिकामान
येअत्यंतअज्ञानी ॥ जयाआस्थावेदांतश्रवणीं ॥ उपजेना ॥ १९ ॥ अत्यं
तअज्ञानीम्हणसीकोण ॥ तरीत्याचेंहीसांगतोंलक्षण ॥ आतांएकाग्रकरूनियामन॥
आयकावें ॥ २० ॥ मीदेहहेंचिज्यालाद्दढभान ॥ स्त्रीपुत्रादिकमाझींम्हणेभ्रांतीनें॥
ऐसाअत्यंतअज्ञानीनव्हेजाण ॥ अधिकारी ॥ २१ ॥ देहकवणाचामीकवण ॥ को
णचालकहेंनेणेआपण ॥ ऐसाअत्यंतअज्ञानीनव्हेजाण ॥ अधिकारी ॥ २२ ॥ श
रीराहुनीअसेंमीभिन्न ॥ अज्ञानेंबद्धहेंनाहींस्मरण ॥ऐसा० ॥अधिकारी ॥२३॥ आ
पलीबद्धताआणिमुक्तापूर्ण ॥ हेदोन्हीनजाणेविचारहीन ॥ ऐसाअत्यंतअज्ञानी
नव्हेजाण ॥ अधिकारी ॥ २४ ॥ वेव्हारींबराअसेनिपुण ॥ कांहींनविचारीपापपु

ण्य ॥ ऐसाअत्यंतअज्ञानीनव्हेजाण ॥ अधिकारी ॥ २५ ॥ पशुवत्जडमूढमली
न ॥ केवलशिश्नोदरपरायण ॥ नेणेमुख्यदेवतोआहेकवण ॥ पूजीपाषाणातें॥२६॥
ज्यालानावडेअध्यात्मश्रवण ॥ सदांसाधुनिंदाकरणें ॥ नाहींनम्रतागोडबोलणें ॥
दुर्व्यसनी ॥२७॥ ऐसाभ्रांतजालादहाभिमानें ॥ दृष्टीसीनआणीसंतसज्जन ॥ जें
कांहींवेदशास्त्रपठन ॥ पोटासाठीं ॥ २८ ॥ प्राप्तजालियावैभव ॥ तेणेंचित्तींहोयम
हागर्व ॥ लाभपूजाख्यातिगौरव ॥ इच्छीसर्वदा ॥ २९ ॥ जेंकांहींकरीकर्माचरण॥
तेंअवघेंदांभिकपण ॥ आपलीचप्रशंसाआपण ॥ बोलेकैसा ॥ ३० ॥ आपणापुढें
कोण्हीमांडूंदेइना ॥ ज्यालासज्जनाचाउत्कर्षसाहेना ॥ घातपातादिकदुर्वासना ॥
धरीचित्तीं ॥ ३१ ॥ जेणेंत्रासतीसकललोक ॥ ऐसीजयाचीवर्तणुक ॥ दुष्टकर्मावांचू
निआणिक ॥ नावडेकांहीं ॥ ३२ ॥ आपुलेगुणदोषनविचारी ॥ दुसऱ्याचेतत्का
लप्रगटकरी ॥ कपटवसेजयाचेअंतरीं ॥ जैसामैंद ॥ ३३ ॥ दुसऱ्यासीदुःखजालि
याविशेष ॥ तेंमानीपरमसंतोष ॥ हृदयींनाहींदयेचालेश ॥ अणुमात्र ॥ ३४ ॥ द्र
व्यदारायांचेंसदांध्यान ॥ संसारींआसक्तनिशिदिन ॥ अनेकविक्षेपजालियाहीजा
ण ॥ नमानीत्रास ॥ ३५ ॥ कांहींप्राप्तजालियाहोयसुख ॥ अप्राप्तीनेंमानीपरमदुः
ख ॥ निजात्मसाधनींविमुख ॥ अविचारें ॥ ३६ ॥ पडेकाम्यनिषिद्धकर्मप्रवाहीं ॥

त्यालाहिताहितउमजेनाकांहीं ॥ जन्ममरणादिदुःखांचेंनाहीं ॥ अनुसंधान॥३७॥
मीधनवंतचालकशहाणा ॥ मजसारिखाकोणीअसेना ॥ यागर्वेंकोठेंहीमावेना ॥
उताणाचाले ॥ ३८ ॥ म्हणेमीकुलिनमाझासदाचार ॥ तेणेंअंगींचढेताठाफार ॥
कोण्हीदेखोनिसज्ञानइतर ॥ करीद्वेष ॥ ३९ ॥ कांहींकेल्याज्याचेंमनद्रवेना ॥ प
रमकठीणजोसदांलवेना ॥ भल्याचीकरितसेहेळणा ॥ नानापरी ॥ ४० ॥ प्रा
णीकाळाचेतोंडींपडती ॥ तेचिआहेआपणागती ॥ ऐसेंकांहींचस्मरेनाजोचित्तीं ॥
भ्रांतपणें ॥ ४१ ॥ तीर्थतपोवनेंजेसाधुसज्जन ॥ तेठाईंनवजायआपण ॥ भ्रष्टपा
खांडीकवेव्हारिकजन ॥ तेआवडती ॥ ४२ ॥ धरोनिफलाशामानसीं ॥ मगभजे
नानादेवतांसी ॥ जयाचीनाहींकोणापासीं ॥ एकनिष्ठा ॥ ४३ ॥ सत्यमानोनीरा
हेविषयसुख ॥ परमार्थसाधनींहोयविमुख ॥ हाचिजाणावाकेवळमूर्ख ॥ निश्चयें
सी ॥ ४४॥ ज्यालाप्रपंचींबहुतआदर ॥ परमार्थाचातिरस्कार ॥ संताच्याकरीनिरं
तर ॥ रांडोलिया ॥ ४५ ॥ जन्माआलियागमाविलेंवय ॥ अकस्मात्मृत्युनेईल
निश्चय ॥ हेंकांहींचवाटतनाहींभय ॥ ज्याच्याचित्ता ॥४६॥ भरलारजतमोगुणें ॥
नाहींज्यापासींसात्त्विकलक्षणें ॥ आतांवाचेंकितीबोलावेजाण ॥ अवगुण ॥ ४७॥
ऐसाजोअत्यंतअज्ञानी ॥ आणिजीवन्मुक्तअत्यंतज्ञानी ॥ अधिकारीनव्हेतहेदो

न्ही ॥ श्रवणासी ॥ ४८ ॥ नसेअपरोक्षअत्यंतज्ञान ॥ नाहींमूढत्वअत्यंतअज्ञान॥
ऐसामध्यतोअधिकारीजाण ॥ याश्रवणीं ॥ ४९ ॥ ऐसेंसंक्षेपेंबोलेआपण ॥ गोपा
लाश्रमरूपीगजानन ॥ जोसद्गुरुसच्चिदानंदघन ॥ दयासिंधु ॥ ५० ॥ ऐकूनदेवा
चेंवचन ॥ संतोषलागोसावीनंदन ॥ मध्यस्थाचेंलक्षण ॥ सांगावेंजी ॥ ५१ ॥
म्हणूनिघातलेंलोटांगण ॥ मगआलिंगिलेंगजाननें ॥ म्हणेमध्यस्थाचेंलक्षण ॥
सांगोंआतां ॥ ५२ ॥ जोविधियुक्तबरावेदपढला ॥ जाणोनितयाच्याअर्थाला ॥
जैसेंबोलिलेंतैसेंकरूंलागला ॥ कर्माचरण ॥ ५३ ॥ याजन्मींअथवाजन्मांतरीं ॥
ऐसाअसावानिर्धारीं ॥ येविषयींसंशयअंतरीं ॥ नधरावा ॥ ५४ ॥ जोकाम्यनिषि
द्धवर्जित ॥ आचरेचारींकर्मेंविहित ॥ नित्यनैमित्तिकेंप्रायश्चित्त ॥ उपासना ॥५५॥
येणेंदूरकेलेदोषसकळ ॥ आणिसहजहोयचित्तनिर्मळ॥ तेणेंसाधनचतुष्टयतत्काळ॥
घडेत्यासी ॥ ५६ ॥ हेंसंक्षेपेंसांगितलेंजाण ॥ आतांसविस्तरकरूंनिरूपण ॥ का
म्यआणिनिषिद्धाचेंलक्षण ॥ आईकआधीं ॥५७ ॥ ज्योतिष्टोमादिकयागकरणें ॥
स्वर्गफलभोगइच्छूनियामनें ॥ हेंचिकाम्याचेंस्वरूपजाणणें ॥ निश्चयेंसी ॥ ५८॥
गांठींपुण्यस्वर्गवासतोंवरी ॥ पुण्यसरतांपतननिर्धारीं॥ ऐसेंजाणोनिसहजअंतरीं॥
निष्कामहोय ॥ ५९ ॥ आतांऐकपापकर्मनिषिद्ध ॥ जेंब्रह्महत्यादिकप्रसिद्ध ॥ तें

आचरतांनरकसिद्ध ॥ जोडेकैसा ॥ ६० ॥ म्हणेयेणेंयमकरितसेदंड ॥ आणिको
णेंभोगावेंनरककुंड ॥ निषिद्धकर्माचेंकाळेंतोंड ॥ आचरेनामी ॥ ६१ ॥ येणेंहोइ
नासार्थकआपुलें ॥ म्हणोनिकाम्यनिषिद्धवर्जिलें ॥ जेंनित्यनैमित्तकादिबोलिलें ॥
तेंचिकरी ॥ ६२ ॥ नित्यकर्मजेंप्रतिदिनींकरणें ॥ स्नानसंध्याअग्निसेवादेवतार्चनें ॥
पंचमहायज्ञादिकसंपादणें ॥ बरव्यापरीं ॥ ६३ ॥ नित्यकर्माहूनवाढेअधिक ॥ त
यालाम्हणावेंनैमित्तिक ॥ तेंजातकर्मपर्वकालादिक ॥ आचरावें ॥ ६४ ॥ जेंनक
रितांघडेप्रत्यवाय ॥ म्हणोनिसर्वथाटाकूंनये ॥ प्रायश्चित्तचांद्रायणादिकस्वयें ॥ तें
हिकीजे ॥ ६५ ॥ जेंप्राप्तजालियाविहित ॥ चांद्रायणादिकप्रायश्चित्त ॥ तेंआचरा
वेंअगत्य ॥ यथाविधीं ॥ ६६ ॥ जेंस्ववर्णाश्रमींकर्मउचित ॥ तेंआचरावेंफलहेतुर
हित ॥ मगईश्वरार्पणकरावेंसमस्त ॥ नित्यादिक ॥ ६७ ॥ येणेंनासतीदोषसक
ल ॥ कैंचेंकामक्रोधादिकमल ॥ होयअंतःकरणनिर्मल ॥ सहजची ॥ ६८ ॥
तेव्हांपश्चात्तापपावेमन ॥ तेंचितयाचेंनिर्मळपण ॥ तेंस्थिरव्हावयाकारण ॥
उपासना ॥ ६९ ॥ गणेशदुर्गाविष्णुशिवतरणी ॥ हेपांचहीअभिन्नत्वेंसत्यमानी ॥
यांतरूपजेंआवडेलमनीं ॥ तेंचिंतावें ॥ ७० ॥ अथवाकरावेंसद्गुरूचेंध्यान ॥ तेणेंहो
ईलनिश्चलमन ॥ याकारणेंबोलिलीसगुण ॥ उपासना ॥ ७१ ॥ नित्यादिकर्मेंचि

त्ताचीशुद्धता ॥ उपासनेनेंहोयएकाग्रता ॥ म्हणोनिहेंआपुलियाहिता ॥ आचरे
तो ॥ ७२ ॥ याहिवरीतोअधिकारीपूर्ण ॥ साधनचतुष्टयसंपन्न ॥ त्याचेंहीसविस्त
रलक्षण ॥ सांगतोंमी ॥ ७३ ॥ आतांसाधनचतुष्टयआइक ॥ प्रथमनित्यानित्यव
स्तुविवेक ॥ इहामुत्रफलभोगविरागदेख ॥ दूसरेंतें ॥ ७४ शमदमादिषट्कतृतीय ॥
चौथेंमुमुक्षुतानिश्चय ॥ ऐसेंहेंसाधनचतुष्टय ॥ जाणावेंगा ॥ ७५ ॥ नित्यम्हणि
जेजेअविनाश॥आत्मरूपएकस्वप्रकाश॥अनित्यनाशवंतसर्वदृश्य॥देहादिक ॥७६॥
ऐसेंबरव्याप्रकारींजाणावें ॥ नित्यानित्यविवेकमानावें ॥ आतांदुसरेंसाधनस्वभावें ॥
सांगिजेल॥७७॥इहम्हणजेहालोक॥येथीलभोगराज्यादिक॥स्त्रियादिविषयअनेक॥
तेनावडती ॥७८॥ अमुत्रम्हणजेस्वर्गलोक ॥ तेथीलविषयअमृतादिक ॥ तेहीअंत
रींमानीसकळिक ॥ तृणप्राय ॥ ७९ ॥ काकविष्ठाविषवमिलेंजेंअन्न ॥ तैसेंदेखेइह
स्वर्गसुखजाण ॥ नाशिवंतम्हणोनिआसक्तमन ॥ नव्हेकोठें ॥ ८० ॥ ऐसेंजया
लाउपजेवैराग्य ॥ तोचिजाणावापरमसभाग्य ॥ इहामुत्रफलभोगविराग ॥ याचि
नांवें ॥ ८१ ॥ आतांशमदमादिषट्कसाधन ॥ शमदमउपरतिजाण ॥ तितिक्षासमा
धानश्रद्धापूर्ण ॥ अनुक्रमें ॥ ८२ ॥ श्रवणादिव्यतिरिक्तजेविषय ॥ तेठाईंमनजा
ऊंनये ॥ हाजाणावाअंतरइंद्रिय ॥ निग्रहतो ॥ ८३ ॥ सदैववासनात्यागकीजेने

म ॥ याचिनांवेंबोलिजेगाशम ॥ षट्कांतीलसांगितलेंप्रथम ॥ साधनहें ॥ ८४ ॥
बाह्यज्ञानइंद्रियेंकर्मेंद्रियें ॥ याचेंजेंजेआहेतिविषय ॥ त्यापासूनियाविमुखताहोय॥
ऐसेंकीजे ॥ ८५ ॥ इंद्रियेंधावतीविषयव्यापारीं ॥ तेथूनआवरावींझडकरी ॥ बाह्य
इंद्रियनिग्रहनिर्धारीं ॥ जाणबाह्यहा॥८६॥याजलाचिम्हणतीगादम ॥ हेंदुसरेंसाध
नउत्तम ॥ आतांतिसरेंसांगोंनिरुपम ॥ उपरति ॥ ८७ ॥ जींसकलइंद्रियेंआप
लीं ॥ विषयापासूनिफिरविलीं ॥ तींजाऊंनद्यावींतेस्थलीं ॥ पुनरपि ॥ ८८ ॥ भ
गवद्भजनींसदांलावावीं ॥ श्रवणादिसाधनेंगोंवावीं ॥ हेचिनिश्चयेंसीजाणावी ॥ उ
परति ॥ ८९ ॥ स्ववर्णाश्रमधर्मींप्रवर्ततां ॥ नित्यनैमित्तिकादिकआचरतां॥तेथेंशी
तोष्णबाधीतत्त्वतां॥सहावींते ॥९०॥ प्रारब्धेंसुखदुःखेंहोतीनिर्माण ॥ तींसोसूनिपर
मार्थसाधन ॥ तयाचेंनांवतितिक्षाजाण ॥ साधनचौथें ॥ ९१ ॥ मनसर्वांपासूनिउ
परमिलें ॥ श्रवणादिसाधनींविनटलें ॥ तेणेंकरूनिपूर्णपावलें ॥ एकाग्रता ॥ ९२ ॥
याजलासमाधानम्हणावें ॥ षट्कांतीलपाचवेंजाणावें ॥ आतांसागेनसाधनसाहावें॥
श्रद्धातुज ॥९३॥ सच्छास्त्रआणिसद्गुरुवचनीं ॥ रहावेंदृढविश्वासधरूनी ॥ याचिनां
वश्रद्धासत्यमानी ॥ शेवटील ॥ ९४ ॥ हेंशमदमादिषड्कजाणावेंबरें ॥ साधनचतुष्ट
यांतीलतिसरें ॥ आतांचौथेंऐकावेंआदरें ॥ मुमुक्षुता ॥ ९५ ॥ अज्ञानेंपावलोंसं

सारबंधन ॥ यापासूनकेव्हांमुक्तहोईन ॥ ऐसीइच्छाउपजेनिशिदिन ॥ तेमुमुक्षुता ॥९६॥ केव्हांहोईलअपरोक्षात्मज्ञान ॥ तेणेंपावेनमीसमाधान ॥ ऐसीइच्छाउपजे निशिदिन ॥ तेमुमुक्षुता ॥ ९७ ॥ केव्हांफिटेलअनादिअज्ञान ॥ आतांजाईनसद्गुरु सीशरण॥ऐसी० ॥ तेमुमुक्षुता ॥ ९८॥ म्हणेतापत्रयेंतापलोंपूर्ण ॥ यापासूनिमुक्त व्हावेंआपण॥ऐसीइच्छाउपजेनिशिदिन॥तेमुमुक्षुता॥९९॥ऐसामुमुक्षुसाधनसंपन्न ॥ तोचिअधिकारीमध्यस्थजाण ॥त्यासीतत्कालठसावेब्रह्मज्ञान ॥ उपदेशितां ॥१००॥ सर्वपदार्थज्ञानकळलेंज्याला ॥ म्हणेमीआहेंशरीरावेगळा ॥ ऐसेंजालेंपरीअज्ञानेंवे ष्टिला ॥ असेबद्ध ॥ १ ॥ सामान्यज्ञानेंमानीमीदेहातीत ॥ अज्ञानेंम्हणेमीबद्धनि श्चित ॥ इकडेनातिकडेऐसाबहुत ॥ कष्टीहोय ॥ २ ॥ जरीम्हणावाअत्यंतज्ञानी ॥ तरीतोविषयदोषदर्शनी ॥ आणिसाक्षात्काराविणेंनव्हेज्ञानी ॥ अत्यंततो ॥ ३ ॥ ज्यासकांहींज्ञानकांहींअज्ञान ॥ तोअधिकारीमध्यस्थजाण ॥ म्हणेमीपावलोंव्यर्थ बंधन ॥ करूंकाय ॥ ४ ॥ जोअतिदक्षसाधनसंपन्न ॥ पूर्वपक्षाचेंकरूनिशोधन ॥ परोक्षज्ञानेंअपरोक्षतापूर्ण ॥ साधितसे ॥ ५ ॥ अनेकजन्ममरणावर्त ॥ त्यादुःखानु संधानेंभयभीत ॥ तापत्रयेंसंतप्तइच्छित ॥ मोक्षासीजो ॥ ६ ॥अग्निलागलाजया चेमस्तकीं ॥ तोबुडोदेयाचालिलाउदकीं ॥ त्यासीपदार्थनावडेआणखी ॥ दृष्टींपड

तां ॥ ७ ॥ तैसात्रिविधतापेंजोतापला ॥ शीघ्रशरणजायसद्गुरूला ॥ कांहींगोडन
वाटेतयाला ॥ अन्यविषय ॥ ८ ॥ धर्मार्थकाममोक्षअभिधानें ॥ हेचारीपुरुषार्थप्र
सिद्धजाण॥यांतमुख्यमोक्षतोब्रह्मज्ञानें ॥ प्राप्तहोय ॥ ९ ॥ हेंजाणोनिकरीवेदांत
श्रवण ॥ अन्यशास्त्रींसहजउदासीन ॥ज्यासद्गुरुवाक्यींविश्वासपूर्ण॥ तोचिमध्यस्थ
॥ ११० ॥ म्हणेमोक्षनव्हेसद्गुरुरहित ॥ ऐसेंकळतेंमजनिश्चित ॥ आतांशरणजावें
त्वरित ॥ तयालागीं ॥ ११॥ उपदेशीलतोब्रह्मज्ञान॥तेणेंनिरसेलअनादिअज्ञान ॥
मगकैचेंसंसारबंधन ॥ होईनमुक्त ॥ १२ ॥ ऐसानिश्चयजयापाशीं ॥ तोचिअधि
कारीपरियेसी ॥ पूर्णआस्थाहोयतयासी ॥ याश्रवणीं ॥ १३ ॥ यासीविषयकदां
नावडती ॥ साधुभजनींअत्यंतप्रीति ॥ जेसांगितलीसाधनसंपत्ति ॥ तेजयापाशी
॥ १४ ॥ ऐसेंऐकोनदेवाचेंवचन ॥ मगविनवीगोसावीनंदन ॥ म्हणेअधिकारिया
चींलक्षणें ॥ सांगितलींजीं ॥१५॥ त्यांतीलएकहीनाहींमजपाशी ॥ केवळजडमूढ
मीनिश्चयेंसी ॥ कैसाअधिकारीहोईनज्ञानासी ॥ आशंकाहे ॥ १६ ॥ परिसोनभ
क्ताचेंवचन ॥ गोपालाश्रमगजानन ॥ म्हणेअनेकजन्मींचींसाधनें ॥ फलतीजें
॥ १७ ॥ तेणेंअंगींसाधनेंनदिसतां ॥ अकस्मात्उपजेमुमुक्षुता ॥ सद्गुरूसीशरण
जावेंआतां ॥ ऐसेंवाटे ॥ १८ ॥ जंवमुमुक्षतानाहींज्यापाशी ॥ तंवश्रमचिअवघानि

श्वयेंसी ॥ क्षुधेविणसामुग्रीजैसी ॥ वांयाजाय ॥ १९ ॥ जोसद्गुरूशीरिघालाश
रण ॥ तोचिसकलसाधनसंपन्न ॥ अधिकारियाचेंमुख्यलक्षण॥हेंचिबापा॥१२०॥
त्यापरीतुझाभावदेखिला ॥ ज्ञानउपदेशकरावातुजला ॥ म्हणोनिअंतरींउपजला॥
ऐसाहेतु ॥ २१ ॥ अधिकारीमुमुक्षुतोचिसच्छिष्य ॥ त्यासीब्रह्मज्ञानाचाउपदेश॥
सद्गुरूनेंकरावाअवश्य ॥ तत्कालेंचि ॥ २२ ॥ गुरुआणिशिष्याचेंलक्षण ॥ त्याचें
हिकरीजेलनिरोपण ॥ श्रवणेंकरोनिसमाधान ॥ पावशील ॥ २३ ॥ ऐसीऐकोन
सद्गुरुवाणी ॥ मगगोसावीनंदनत्याक्षणीं ॥ म्हणेजेंहोतेंमाझेंमनीं॥तेंचिवदलेति
॥ २४ ॥ संपलेंतृतीयप्रकरण ॥ जेथेंअधिकारियाचेंलक्षण ॥ बोलिलागोसावीनंद
न ॥ यथामतीं ॥ १२५ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसावीनंदनसंवादे अधि
कारीनिरोपणं नाम तृतीयप्रकरणं समाप्तम् ॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ श्रीगोपाश्रमरूपीगणेश ॥ सद्गुरुब्रह्मस्वप्रकाश ॥ म्हणेभक्ता
ऐकसावकाश ॥ गुरुलक्षण ॥ १ ॥ एकगुरुईश्वरजाण ॥ त्याचेंनाहींप्रत्यक्षदर्शन॥
सद्गुरुवांचोनिब्रह्मज्ञान ॥ सांगेलकोण ॥ २॥ एकगुरुश्रीपादसंन्यासी ॥ तेस्थापि
तीआपुल्याआश्रमासी ॥ ब्रह्मज्ञानाचेंनांवकोणापाशीं ॥ घेऊंनदेती ॥ ३ ॥ एक
गुरूमातापिताअसती ॥ तेप्रपंचधंदाकरविती ॥ परंतुपाविजेनाजीवन्मुक्ति ॥ सद्गु

रुविना ॥ ४ ॥ एकअसेउपाध्यायकुलगुरू ॥ सांगेगायत्रीमंत्राचाप्रकारु ॥ नदि
सेसारसारविचारू ॥ तयापाशी ॥ ५ ॥ एकगुरुसर्ववर्णांसीब्राह्मण ॥ तोवर्णाश्रम
धर्मशिकवीजाण ॥ परिसद्गुरुविणब्रह्मज्ञान ॥ प्राप्तनोहे ॥ ६ ॥ जितुकियांततितु
कागुरु ॥ त्यांसिआपलालाअहंकारु ॥ संसारसागरींचातारु ॥ तोसद्गुरूची ॥७ ॥
एकगुरुस्वप्नींचास्वतंत्र ॥ ऐसेनानाप्रकारींचेविचित्र ॥ एकगुरूपढवितीवेदशास्त्र ॥
व्याकरण ॥ ८ ॥ एकगुरुशिकवितीलेखन ॥ मंत्रयंत्रगुटिकामोहन ॥ जारणमार
णउच्चाटनस्तंभन ॥ वशीकरणें ॥ ९ ॥ एकसांगतीआगमपूजन ॥ प्रेतभूतयक्षि
णीसाधन ॥ नानावाद्येंतानमानगायन ॥ नृत्यकळा ॥ १० ॥ एकसांगतीज्योतिष
वैद्यक ॥ वादशक्तिविचारधातुनाटक ॥ सभाचातुर्यश्रृंगारचेटक ॥ शांबरीमंत्र॥११॥
एकसांगतीकविताछंदगण ॥ अनेकदेशभाषाबोलणें ॥ शस्त्रविद्याअश्वादिवाहनें ॥
शकुनवंती ॥ १२ ॥ एकसांगतीकर्ममार्गगहन ॥ व्रतयज्ञतीर्थउग्रअनुष्ठान ॥ नाद
लयलक्षमुद्रादान ॥ हटयोग ॥ १३ ॥ एकगुरुभ्रष्टाकारकरविती ॥ स्वधर्मापासून
चेववीती ॥ एकअरण्यांतबैसविती ॥ त्यागूनिसर्व ॥ १४ ॥ एकसांगतीकिंचापरमा
र्थ ॥ वेव्हारकरावामिळवावाअर्थ ॥ यावेगळाअवघाव्यर्थ ॥ घटाटोप ॥ १५ ॥ ये
कभोंदूबरव्यागोष्टीसांगती ॥ भलत्यापरीशिष्यासीठकविती ॥ नानाविद्येचापसारा

मांडिती ॥ पोटासाठीं ॥ १६ ॥ एकआपलीमहंतीवाढविती ॥ शिष्याचेंगोंवारेंमेळ
विती ॥ गर्वेंकलहनिंदावादकरिती ॥ अविवेकें ॥ १७ ॥ ऐसानानाविद्यानानाव्य
वहार ॥ त्यांतेशिकवितोगुरूसाचार ॥ परंतुतरवेनाभवसागर ॥ सद्गुरुविण॥१८॥
गुरुआंधळेशिष्यआंधळे ॥ त्यासींपरमार्थनकळे ॥ जाऊनिभ्रमांधकूपींपडले॥
अवघेजन ॥ १९ ॥ वित्तहारकउदंडगुरू ॥ परितापहर्ताविरलासद्गुरु ॥ ज्याचेनि
पाविजेपैलपारु ॥ भवार्णवाचा ॥ २० ॥ जोउपदेशीब्रह्मज्ञान ॥ निरसीअनादि
अज्ञान ॥ जीवब्रह्मैक्यताकरोपूर्ण ॥ तोचिसद्गुरु ॥ २१॥ जोउगवीजडाजडगोंवा॥
दाखवीकैवल्याचाठेवा ॥ त्याचेनिब्रह्मानंदजोडेजीवा ॥ तोचिसद्गुरु ॥ २२ ॥ जोता
पत्रयातेंशमवी ॥ जन्ममरणादिकचुकवी ॥ भवबंधनापासूनिसोडवी ॥ तोचिसद्गुरु
॥ २३ ॥ तत्कालसंशयातेंफेडी ॥ त्रिविधकर्माचेंजाळेंतोडी ॥ जिताचिदेमुक्तिरोक
डी ॥ तोचि० ॥ २४ ॥ नामरूपात्मकदुस्तरमाया ॥ कोणसमर्थइचापारपावाव
या ॥ तेज्याच्यावाक्येंपावेविलया ॥ तो० ॥ २५ ॥ वासनानदीखल्लाळींपडला ॥
कासावीसहोतांवाहतचालिला ॥ कासेलावूनितारीतयाला॥तोचिसद्गुरु०॥ २६ ॥
पडलासंसारअरण्यांत ॥ कामक्रोधादिव्याघ्रींवेष्टित ॥ तयापासूनिसोडवीनिश्चित॥
तोचिसद्गुरु०॥२७॥विषयभुजंगींदंशिला॥कांहींउमजपडेनातयाला॥तेंविषउतरावया

सामर्थ्यज्याला॥तोचिसद्गुरु० ॥२८॥जोझडपिलापंचमहाभूतीं॥तेणेंअहंममतेचीदृढ
भ्रांति॥त्याचीझाडणीकरीबरव्यारिती॥ तोचि० ॥२९॥जोपडलामिथ्याद्वैतसंकटीं ॥
त्यासीबैसवीअद्वैतराज्यपटीं ॥ चुकवीसंसारआटाआटी ॥ तोचिसद्गुरु ॥ ३० ॥ दे
हींअसोनिविदेहस्थिती ॥ नेणेकामक्रोधादिकवृत्ति॥ज्यापासींदयाआणिशांति ॥ तो
चिसद्गुरु ॥ ३१ ॥ नसेआपपरज्याचीसमदृष्टी ॥ ब्रह्मरूपदेखेसकळसृष्टी ॥ जेथें
नाहींदुराग्रहाचीगोष्टी ॥ तोचिसद्गुरु ॥ ३२ ॥ ब्रह्मानंदेंतृप्तअंतरीं ॥ जनासारि
खावर्तेबाहेरी ॥ नटाचेपरीसंपादणीकरी ॥ तोचि० ॥ ३३ ॥ बोलणेंअद्वैतनिजव
र्म ॥ तेणेंकर्माकर्मनिष्कर्म ॥ त्याहीवरीआचरेसत्कर्म॥तोचि०॥३४॥जेंबोलिलेंआहे
शास्त्रींवेदीं ॥ तेंचिकर्मआदरेंप्रतिपादी ॥ विरुद्धपाखांडमतउच्छेदी॥ तोचिसद्
गुरु॥ ३५॥करीस्ववर्णाश्रमधर्माचरण॥भक्तिवैराग्यज्ञानसंपन्न ॥ब्रह्मविद्याबोधावया
सामर्थ्यपूर्ण ॥ तो० ॥ ३६ जडमूढपिशाचउन्मत्तपणें॥ज्ञानीआपणचितरलेजाण॥
स्वयेंतरोनिदुसऱ्यासीतारणें ॥ तोचिसद्गुरु ॥ ३७ ॥ निर्विकल्पसमाधिअवलंबो
नी ॥ जरीसदांराहीतेब्रह्मज्ञानी ॥ तेव्हांउपदेशव्यवहाराचीहानी ॥ होतीसह
ज ॥ ३८ ॥ जोसंसारदुःखेंपिडिला ॥ कोठेंविश्रांतिनुपजेज्याला ॥ कोणतारिल
त्याप्राण्याला ॥ सद्गुरुविण ॥ ३९ ॥ म्हणोनिनिर्विकल्पतासांडोनि ॥ सविकल्प

समाधिअवलंबोनि ॥ परोपकारार्थविचरेजनीं ॥ तोचिसद्गुरु ॥ ४० ॥ पाहतांशास्त्र आहेअपार ॥ त्यामधूनिपरमार्थसार ॥ निवडूनिडोळादाखवीसत्वर ॥ तोचिसद्गुरु ॥ ४१ ॥ जेंउपनिषदींप्रतिपादिलें ॥ जेंएकचिसर्वसंतींअनुभविलें ॥ त्याचासाक्षात्कारकरीएक्याबोलें ॥ तोचिसद्गुरु ॥ ४२ ॥ विश्वींविश्वपणेंअवघादेव ॥ हापूर्णठसावलाअनुभव ॥ जेथेंनाहींगुरुशिष्यभाव ॥ तोचिसद्गुरु ॥ ४३ ॥ कोणाचेंचित्तदुखविना ॥ जोप्रियवाटेसकळजना ॥ असेअखंडज्याचियामना ॥ समाधान ॥ ४४ ॥ लाभपूजाख्यातीचीनाहींचाड ॥ सहजघडेतेंमानीगोड ॥ शिष्याचीसर्वथानधरीभीड ॥ तोचिसद्गुरु ॥ ४५ ॥ एकाएकींशिष्यासीबोधहोईना ॥ त्यासीक्षणक्षणांसांगतांत्रासेना ॥ माउलीच्यापरीउपेक्षिना ॥ तोचिसद्गुरु ॥ ४६ ॥जेकांहींशिष्यआशंकाकरी ॥ तेछेदूनटाकीवरिच्यावरी ॥ ऐसीबोधशक्तिपुरी ॥ तोचिसद्गुरु ॥ ४७ ॥ आपणभोगीज्यापूर्णसुखासी ॥ तेप्राप्तिव्हावीसाधकासी ॥ ऐसीइच्छाजयाचेमानसीं ॥ तोचिसद्गुरु ॥ ४८ ॥ सद्वस्तूचाकरूनीनिर्धार ॥ जोनकरीमोक्षाचाउधार ॥ याचिदेहींकरीतसेउद्धार ॥ तोचिसद्गुरु ॥ ४९ ॥ कोणासीदाटूनउपदेशकरीना ॥शरणआलियाअंतरदेईना॥ निंदास्तुतीच्यावाटेजाईना ॥ तोचि० ॥५०॥जोकदापिहोईनाशिष्याधीन॥जोइच्छीनाशिष्याचेंधन ॥जोशिष्याचेंरक्षीनाम

न॥तोचिसद्गुरु॥५१॥रोग्याहातींपथ्यनकरवी॥ वैद्यआपुलीजीविकावाढवी॥तैसाका
नफुंकोनगोंवी॥पोटासाठीं॥५२॥शिष्यासीआवडेजोविषय॥त्याचाअंगिकारकरवीस्व
यें॥तोगुरुभीडसारुकामानये॥बुडवणा॥५३॥व्यर्थगोंवूनिशिष्यानाडी॥विवेकवैराग्या
सीअंतरपाडी ॥ त्याचेनिभवसागरपैलथडी ॥ पाविजेना ॥ ५४ ॥ अद्वैतनिरोप
णींवक्ताविशेष ॥ अंतरींदुराशामोठादोष ॥ त्याचेनिदृढसंसारपाश ॥ तुटेकैसा
॥ ५५ ॥ ज्यासीकोणाचीनाहींलोलिंगता ॥ जेथेंअसेपूर्णनिःष्कामता ॥ तोचिसद्गु
रुजाणावातत्त्वतां ॥ मोक्षदाता ॥ ५६ ॥ अंतरींनिश्चयात्मकब्रह्मज्ञान ॥ बाह्यक
रीसत्कर्माचरण ॥ नवविधाभक्तिचेंपाळण ॥ विरक्तता ॥ ५७ ॥ अखंडवेदांतचर्चा
करणें ॥ जेथेंसारासारविवरण ॥ हेंचिमुख्यजाणावेंलक्षण ॥ सद्गुरूचें ॥ ५८ ॥
तेथेंचिसाधकपावतीविश्रांति ॥ समुलतुटेअविद्याभ्रांति ॥ जीताचिमुक्ततापाविजेतृ
प्ति ॥ ब्रह्मानंदें ॥५९॥ संतापासींपाहिजेतिहींलक्षणें ॥ साधकाच्याउद्धाराकारणें॥
परोपकारार्थत्याचेंवर्तणें ॥ असेबापा ॥ ६० ॥ संतज्याप्रकारेंकर्मकरिती ॥ तैसें
चिसाधकहीआचरती ॥ जैसेडोळसामागेंचालती ॥ बहुतआंधळे॥ ६१ ॥ ज्याज्या
वर्णींचाजोस्वधर्म॥त्याचारक्षूनिआदरपरम॥जेथेंमर्यादानीतिन्यायनेम ॥ तोचिसद्गुरु
॥६२॥जरीराजास्वयेंआहेथोर ॥जवळनसतांसेनापरिवार ॥ कोणीकरीनानमस्कार॥

तयालागीं॥६३॥तैसेंब्रह्मज्ञानीजालापूर्ण ॥ बाह्यनदिसेसत्कर्मानुष्ठान॥त्यासींसद्गु
रुम्हणतीजाण॥साधकजन॥६४॥ज्यालाबहुतांतृप्तकरणें ॥त्यालासामुग्रीफारसंपाद
णें॥तैसेंसंतींआचरोनिदाखवणें॥ सर्वकर्म ॥६५॥ जेंसकललोकांसीमान्य॥ तैसाचव
र्तेनकरीअन्य ॥ उद्धरीऐशासद्गुरूचेंपुण्य ॥ साधकासी ॥ ६६ ॥ ज्याचेतीर्थप्र
सादसेवितां ॥ चित्तासवाटेप्रशस्तता ॥ लोकांमध्येंनदिसेविरुद्धता ॥ तेंचिगुरूप
द ॥६७॥ ज्यागुरूचेंनामसांगतां ॥ परमलज्जावाटेचित्ता ॥ तेव्हांगुरुभक्तिउडालीत
त्वतां ॥ सहजचि ॥ ६८ ॥ गुरुलोपकरितांमहादोष ॥ यास्तवविचारूनिकीजेअव
श्य ॥ जोसेविल्यासकलांसीसंतोष ॥ तोचिसद्गुरु ॥६९॥जरीनीचयातीचागुरूके
ला ॥ परीभक्तिमार्गतोराहिला ॥ ब्राह्मणांदेखतांतयाला ॥ पूजितांनये ॥ ७० ॥
रोकडेंआपणभ्रष्टावें ॥ प्रसादतीर्थचोरूनिघ्यावें ॥ नाहींतरीब्राह्मणस्वभावें ॥ वा
ळितील ॥ ७१ ॥ तेव्हांविकल्पउपजेमनीं ॥ गुरूभक्तीचीजाहालीहानी ॥ यास्त
वगुरूकरावाविचारूनि ॥ यथायोग्य ॥ ७२ ॥ गंगाजलपवित्रजालें ॥ तेंजरी
अशुद्धपात्रींपडिलें ॥ तरीभल्याच्याकार्यापासूनिगेलें ॥ सेवितांतये ॥ ७३ ॥ ज्या
सविदशास्त्राचाअधिकार ॥ त्यापाशींज्ञानउपदेशव्यवहार ॥ कृपेनेंसाधकाचाक
रीउद्धार ॥ तोचिसद्गुरु॥ ७४ ॥तैसेंचनीचयातीसजालेंज्ञान ॥ परितेथेंगुरुत्वनघडे

जाण ॥ म्हणवूनिपात्रापात्रविचारणें ॥ साधकजनीं ॥ ७५ ॥ उदंडज्ञानचर्चाकरि
ती ॥ त्यासाधकाच्याचित्तींनबैसती ॥ ज्यासंतअनुष्ठानेंभरल्याअसती ॥ तेणेंचसि
द्धी ॥ ७६ ॥ जोउत्तमगुणींविराजित ॥ त्याहीवरीकृपाळुअत्यंत ॥ साधकासीता
रीनिश्चित ॥ निजात्मबोधें ॥ ७७ ॥ मुख्यहेंचिसद्गुरूचेंलक्षण ॥ गोसावीनंदनाजा
ण ॥ त्यासीकायावाचामनें ॥ शरणजावें ॥ ७८ ॥ अभक्तासीजोडेपूर्णभक्ति ॥ भ
क्ताउपजेविरक्ति ॥ विरक्ताविवेकमुक्ति ॥ ज्याच्यासंगें ॥ ७९ ॥ ज्यालासंसारसाग
रतरणें ॥ त्याणेंसेवावेसद्गुरुचरण ॥ यावेगळींआणिकसाधनें ॥ नाहींतबापा॥८०॥
जाणविलेंसद्गुरूचेंलक्षण ॥ आतांसांगिजेलशिष्याचेंलक्षण ॥ श्रीगोपाळाश्रमरूपी
गजानन ॥ ऐसेंबोलिले ॥ ८१ ॥ मगगोसावीनंदनेंसद्गुरूला ॥ भावेंसाष्टांगनम
स्कारकेला ॥ म्हणेशिष्याचींलक्षणेंमजला ॥ सांगावींआतां ॥ ८२ ॥ संपविलेंच
तुर्थप्रकरण ॥ जेथेंगुरुभक्तिनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं॥८३॥
इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसावीनंदनसंवादेगुरुलक्षणनिरूपणंनामचतुर्थप्रकर
णंसंपूर्ण ॥ ॥ श्रीरस्तु ॥ ॥ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ मंगलमूर्तिगणेश्वरु ॥ गोपालाश्रमरूपीसदुरु ॥ म्हणेशिष्यल
क्षणाचेंकरूं ॥ निरूपण ॥ १ ॥ एकशिष्यप्रपंचींरात्रंदिवस ॥ रखडतांनमनीक

दांत्रास ॥ सद्गुरुसेवनींकरीआळस ॥ तोकामानये ॥ २ ॥ एकसंसारींआसक्तनि
रंतर ॥ ज्यालास्त्रीपुत्राचालोभफार ॥ सद्गुरुविषईअत्यंतनिष्ठुर ॥ तोकामानये ॥३॥
एकवरीभक्तिदावी ॥ अंतरींकपटमहालाघवी ॥ सद्गुरूलामनुष्यापरीभावी ॥ तो
कामानये ॥ ४ ॥ एकशिष्यघेऊनिउपदेश ॥ कांहींलाभजाल्यामानीसंतोष ॥ अ
लाभेंसद्गुरूलाठेवीदोष ॥ तोकामानये ॥५ ॥ एकशिकूनिमांडीपसारा ॥ तोशिष्य
विद्याचोरजाणावाखरा ॥ सद्गुरुदेखतांधरीफुगारा ॥ तोका० ॥६ ॥ एकएकांतींच
रणींडोईठेवी ॥ आणिसभेंतलाजेअंगचुकवी ॥ सद्गुरूपाशींप्रतिष्ठामीरवी ॥ तो
का० ॥ ७ ॥ एकम्हणेआधींचमत्कारदाखवा ॥ मगतुमचीकरीनमीसेवा ॥ संतां
पाईविश्वासनाहींबरवा ॥ तोका० ॥८॥ एकसद्गुरूलापुसिलेंचिपुसे ॥ नसांगतांक्रो
धासयेतसे ॥ ज्यापाशींकांहींमर्यादानसे ॥ तोकामानये ॥ ९॥ एकशिकूनिपाखांड
नानाकूटें ॥ याचाअर्थसांगाम्हणेहटें ॥ सद्गुरूचीछलनाकरीकपटें ॥ तोकामान०
॥ १० ॥ एकासीहाचिमोठाअभिमान ॥ जैसेंम्हणेतैसेंकीजेसद्गुरूनें ॥ ऐसाअत्यंत
दुराग्रहीजाण ॥ तोका० ॥ ११ ॥ एकशिष्यसंसारींद्रव्यखर्चितां ॥ जोमागेंपुढेंपा
हेनातत्त्वतां ॥ सद्गुरूचेठाईंधरीकृपणता ॥ तोका० ॥ १२॥ एकम्हणेआम्हासीद्या
भांडवल ॥ उदिमकरूनिपोसूंसकळ ॥ ऐसाकुटुंबकाबाडीकेवळ ॥ तोकामानये॥१३॥

एकसद्गुरुवचनासीअव्हेरी ॥ जैसेंमनांतआलेंतैसेंचकरी ॥ ऐसाजोकेवळअहंकारी ॥
तोकामानये ॥ १४ ॥ एकम्हणेसद्गुरूचीसेवाकेली ॥ परंतुआम्हासनाहींफळली ॥
ऐसीलोकांमध्येंकरीवाचाळी ॥ तोकामानये ॥ १५ ॥ एकसर्वस्वींगौरवीइष्टमित्र ॥
सद्गुरूलावाहेतुलशीपत्र ॥ ज्याचाभावमैंदाच्यापरीविचित्र ॥ तोकामानये ॥ १६॥
एकस्वधर्मनकरीसांगितला ॥ दाटूनिप्रवर्तेकुकर्माला ॥ मगबोललावीसद्गुरूला ॥
तोकामानये ॥ १७ ॥ एकलज्जेनेंऐकेनिरूपण ॥ जेव्हांबैसेतेव्हांदुश्चितमन ॥ म्ह
णेकेव्हांसरेलघराजाईन ॥ तोका० ॥ १८ ॥ एकम्हणेआह्मालागलासंसार॥ तै
साचिसंतांसहीसोडीनाघोर ॥ ऐसेपाहेगुणदोषनिरंतर ॥ तोकामानये ॥ १९ ॥
एकवृथापुष्टकेवलटोणपा ॥ तोंडींलागेबाबरदडपा ॥ कांहींकार्यसांगतांचढेकोपा॥
तो० ॥ २० ॥ एकबोलेअखाडावाढवावयाला ॥ दाटूनिउपदेशदिधला ॥ म्हणेत
धींचआह्मींटाकिला ॥ तोकामानये ॥ २१ ॥ एकऐकेअध्यात्मचर्चेसी ॥ घराजाऊ
निमारीस्त्रियेसी ॥ सद्गुरूचीफजीतीकरीऐसी ॥ तो० ॥ २२ ॥ एकह्मणेदर्शनाम
ध्येंकाय ॥ मनींध्यातोंसद्गुरूचेपाय ॥ कांहींकेल्याजवळउभानठाय ॥ तोकामान
ये ॥ २३ ॥ एकउपदेशमात्रघेऊनि ॥ पुन्हांसद्गुरूलानपाहेनयनीं ॥ केवळअधम
अधमाहूनि॥तोका०॥ २४॥एकसांगेआह्मींशिष्यपुरातन॥आतांमेळविलेबहुतनूतन॥

म्हणेकोण्हीआमुचारक्षीनामान ॥ तोका० ॥२५॥ येकसर्वदांअत्यंतमलीन ॥ नक
रीशौचस्नानसंध्याआपण ॥ जेणेंलोकनिंदितीतैसेंवर्तन ॥ तोकामनये० ॥ २६ ॥
येकम्हणेसांगाउपासना ॥ जेणेंपूर्णहोयसर्वकामना ॥ज्यासीमोक्षाचीनाहींवासना॥
तोका० ॥ २७ ॥ एकम्हणेआम्हींगुरुकेलाहोता ॥ त्याचेंज्ञाननयेचिआमुच्याचि
त्ता ॥ म्हणेतुम्हीतरीकांहींसांगाआतां ॥ तोकामानये० ॥ २८ ॥ एकम्हणेआ
म्हीसर्वांतसमर्थ॥सद्गुरूलादेतोंउदंडअर्थ ॥ बोलेवरकडशिष्यतेव्यर्थ॥तोका० ॥२९॥
जारणमारणमोहन ॥ वश्यउच्चाटनस्तंभन ॥ याचामार्गसांगाम्हणेआपण ॥ तोका
मानये० ॥ ३० ॥ एकसांगेमजसारिखासाधक ॥ सद्गुरुपाशींनाहींआणिक ॥ म्ह
णेम्यांअखाडाकेलासकलिक ॥ तोका० ॥ ३१ ॥ येकघटिकाभरीभक्तिकरी ॥ स
र्वेंचिसद्गुरुवरीगुरुगुरी ॥ रडेपडेपिशाचछंदकरी ॥ तोकामानये० ॥ ३२ ॥ एकदी
र्घद्वेषीघातकनिर्दय ॥ ज्यासकांहींपापाचेंनाहींभय ॥ कुतर्कीअविवेकीबोलेअप्रिय॥
तोका० ॥३३॥ येकदेहाभिमानेंपडिलाघोरीं ॥ अखंडकुटुंबाचीचिंताकरी ॥ निद्रा
नलागेतळमळअंतरीं ॥ तोकामानये० ॥ ३४ ॥ एकनधरीविषयकंटाळा ॥ नसेभ
क्तीचापूर्णजिव्हाळा ॥ अज्ञानेंजालाअसेआंधळा ॥ तो० ॥ ३५ ॥ एकम्हणेअन्न
कोठेंमिळेना ॥ आमच्यानेंउद्योगहोईना ॥ सद्गुरुघरींकरूंकालक्रमणा॥ तोका०

॥ ३६ ॥ एकसद्गुरुपाशींअसत्यबोले ॥ जोनीतीनेंसर्वथानचाले ॥ ज्यालासारासा
रकांहींनकळें ॥ तोकामानये० ॥ ३७॥ एकगोडबोलेमुखावरी ॥ मागेंसद्गुरूचीनिं
दाकरी ॥ दुष्टचांडालजोनिर्धारीं ॥ तो० ॥ ३८ ॥ एकविषयासाठींयत्नकरी ॥ प
रमार्थटाकीप्रारब्धावरी ॥ कपाळींनाहींनिर्धारी ॥ तोकामानये ॥ ३९ ॥ एकगो
ष्टीनेंगौरवीनानापरी॥कधींसप्रेमेंपूजननकरी ॥ सद्गुरूचेंउच्छिष्टनपडेघरीं॥तोका०
॥ ४० ॥ एकासीनाहींप्रपंचघोर ॥ रिकामाफिरेनकरीविचार ॥ जोसारीपाटखेळे
निरंतर ॥ तोकामानये ॥४१॥ एकबैसूनियासद्गुरूपाशीं॥काढीविनोदव्यवहारचर्चे
सी ॥ आपुलेंहितविचारीनामानसीं ॥ तोका०॥४२॥वियोगकरूनिसद्गुरूचा ॥ सं
गकरीदुष्टव्यवहारिकांचा ॥ चाकाट्यापिटितांश्रमेनावाचा ॥ तोका० ॥४३॥ ठेऊ
नियाविष्टपासींचित्त ॥ कावळाबैसेराजहंसांत ॥ मुक्ताफळचारादेखोनिबहुत ॥ त्रा
समानी ॥ ४४ ॥ ज्यासीअत्यंतप्रियविषय ॥ तोसंतांपासींबैसोनिकाय ॥ ज्ञानउ
पदेशकरावयाजाय ॥ तयेठाईं ॥ ४५ ॥ जोभाग्यवंताच्यापोटाआला ॥ दाटूनिभी
कमागावयाचालिला ॥ तैसाशिष्यजालातऱ्हीसद्गुरूला ॥ बोलकाय ॥४६॥ श्वा
नासीघातलेंक्षिप्राभोजन ॥ गाढवाअंगींचर्चिलाचंदन ॥ मर्कटासीरत्नसिंहासन ॥
व्यर्थहोय ॥४७॥ तैसाजोविषईआसक्तकेवळ॥ त्यालाज्ञानउपदेशनिर्फळ॥ खडकीं

बीजपेरिल्यापुष्कळ ॥ तेंवायांजाय ॥४८॥ उत्तमबीजखडकींपेरिलें ॥ कांहींपीक होईनावायांगेलें ॥ तैसेंमूर्खासीज्ञानसांगितलें ॥ उपतिष्ठेना ॥४९॥सच्छिष्यउत्तम भूमिकाजे॥तेथेंउत्तमज्ञानबीजपेरिजे॥मंत्रतंत्रादिंकिडेलेंनपाहिजे॥तयेठायीं ॥ ५०॥ सुभूमिसच्छिष्यज्ञानसुकण॥तेथेंपर्जन्यतोवेदांतश्रवण ॥ मगजीवन्मुक्तिसुखसंपूर्ण॥ पीकहोय॥५१॥पिकहातासीयेईजोंवरी॥साधनकरावेंतोंवरी ॥ हेचिनिगाजाणावीनि र्धारीं॥ सोडूंनये॥५२॥म्हणऊनिगोसावीनंदनाजाण॥अधिकारीअसावासुलक्षण ॥ जोमुमुक्षुसाधनसंपन्न ॥ तोचिसच्छिष्य॥५३॥नसांगतांभक्तिकरीतोउत्तम ॥सांगित ल्यावरीकरीतोमध्यम ॥ सांगितल्याहीनकरीअधम ॥ कनिष्ठतो ॥५४॥ सर्वस्वेंश रणसद्गुरूचरणां ॥ चित्तींनाहींअणिककामना ॥ रात्रंदिवसजोविसंबेना ॥ तोचि० ॥ ५५ ॥ झणिसद्गुरूलाहोईलविक्षेप ॥ याजहूनिनसेआणिकपाप ॥ असेंअंतरींवा हेभयअमुप॥तोचिसच्छिष्य ॥ ५६ ॥ ज्यालानित्यघडेसद्गुरुसेवन॥सद्गुरूचाम होत्सावकरणें॥सद्गुरुसाठींशरीरकष्टविणें॥तोचिसच्छिष्य॥५७॥जोकरीसद्गुरूची उपासना॥सगुणसद्गुरूचीमूर्तिआणिध्यानां॥सद्गुरुविणकांहींआवडेना ॥तोचि० ॥ ५८ ॥ नानाविद्यासाधनेंमानीअसार ॥ म्हणेयेकगुरूचीभक्तिसार ॥ ऐसाज्या पाशींसारासारविचार ॥ तोचिस० ॥ ५९ ॥ येथिलसंपदास्वर्गींचेंवैभव ॥ यादो

न्हीचेंजोकदांघेईनानांव ॥ म्हणेसद्गुरुविणसर्ववाव॥तोचि० ॥ ६०॥ सद्गुरूचाछं
दज्याचियेमना ॥ इंद्रियेंलागलींसद्गुरुभजनां ॥तेथूनिकदांमागुतीफिरविना ॥ तो
चि० ॥ ६१ ॥ जींशीतोष्णादिकदुःखेंअनेक ॥ तींस्वयेंसोसूनियासकलिक ॥ सद्
गुरूचीसेवाकरीआवश्यक ॥ तोचि० ॥ ६२॥ जोसद्गुरुचरणींविनटला॥संसारभा
नविसरूनिगेला ॥ तेणेंपूर्णसमाधानपावला ॥ तोचिसच्छिष्य ॥६३॥ ज्याससद्गु
रूवचनींविश्वास ॥ अन्यश्रवणींसहजउदास॥ ऐसाभक्तीचाजेथेंनिवास ॥ तोचिस
च्छिष्य ॥ ६४ ॥ अखंडजोडूंसद्गुरूचेपाय॥ज्यापुढेंमोक्षसुखतेंकाय ॥ ऐसीइच्छा
पूर्णजयाहोय ॥ तोचि० ॥ ६५ ॥ जोमिरविनाआपुलीश्लाघ्यता ॥ विरोनजायस्तव
नकरितां ॥ मानीमिथ्यालाभकीर्तिमान्यता ॥ तोचिसच्छिष्य ॥ ६६ ॥ सर्वथाको
णासीदुःखदेईना ॥ जोक्षमावंतविकारपावेना ॥ अत्यंतप्रियवाटेसर्वजनां ॥ तोचि
स० ॥ ६७ ॥ कदांनुलंघीसद्गुरूचीमर्यादा ॥ स्नेहेंपोषकरीतसेसदां॥ अर्पीसकल
संपदा ॥ तोचिसाच्छिष्य ॥ ६८ ॥ मातापितातीर्थकुलदैवत ॥ योगयागदानेंअनु
ष्ठानव्रत ॥ हेंकांहींचनेणेसद्गुरुरहित ॥ तोचि० ॥६९॥ जोबाह्यांतरींअसेनिर्मल॥
परमार्थसाधनींअचल ॥ इंद्रियेंनकरीबाष्कल ॥ तोचि० ॥ ७० ॥ जोदोषदृष्टीनें
पाहेविषयांसी ॥ कांहींअहंकारनाहींजयापासीं ॥ स्मरेजन्ममृत्युजरादिदुखांसी

तोचि० ॥ ७१ ॥ स्त्रीपुत्रादिकअसेसकल ॥ त्यांच्यासुखदुःखारहितकेवल ॥ इष्टा
निष्टप्राप्तिनेंनव्हेविव्हल ॥ तोचि० ॥ ७२ ॥ जोभजलाचिभजेभगवंतीं ॥ नानावि
घ्नेंयेतांपालटेनावृत्ती ॥ परमयेकनिष्ठाधरोचित्तीं ॥ तोचिस० ॥७३ ॥ स्थलपवित्र
गंगातीरवन ॥ जेथेंदेवस्थानेंसाधुसज्जन ॥ तेथेंवासकरितसेनिशिदिन ॥ तोचि०
॥ ७४ ॥ देहेंद्रियाहूनिआत्माविलक्षण ॥ तयासीविवेकेंनिवडीआपण ॥ साधीअ
परोक्षसाक्षात्कारपूर्ण ॥ तोचि० ॥ ७५ ॥ निरसीअविद्यातत्कार्यदुःखांसी ॥ मग
पावेपूर्णब्रह्मानंदासी ॥ ऐशींज्ञानाचींसाधनेंजयापाशीं ॥ तोचि० ॥ ७६ ॥ निःशे
षमिथ्याचितग्रंथिसुटे ॥ संचितप्रारब्धक्रियमाणआटे॥जयाचासकलसंशयफिटे॥तो
चिसच्छिष्य॥७७॥ऐसाज्ञानयोगासीजोपावेस्वयें॥जिताचिमुक्तहोऊनिठाये ॥जेथेंस
द्गुरुबोधफळेनिश्चयें॥तोचि०॥७८॥तुजलातिसऱ्याप्रकरणींजाण॥सांगितलेंअधिका
रियाचेंलक्षण ॥तेंहेंदेखसीलज्यापाशीचिन्ह॥तोचिस०॥७९॥सात्त्विकप्रेमळविरक्तज
गीं॥तोचिएकज्ञानउपदेशालागीं ॥ होयपरमार्थभाग्याचाविभागी॥अनायासें॥८०॥
सर्वत्रकरणेंजलवर्षाव ॥ हासहजमेघाचाअसेस्वभाव ॥ परीउदकजेथेंखोलठाव ॥
तेथेंचिथांबे ॥ ८१ ॥ तैसासद्गुरुसर्वांसीसांगेज्ञान ॥ तेंसच्छिष्याठाईंउपतिष्ठेजा
ण ॥ नाहींतरीअधिकारियाविण ॥ वायांजाण ॥ ८२ ॥ जोभ्रष्टजालाशिष्यसद्

द्गुरूचा॥त्यासवाटानाहींज्ञानघनाचा॥तोचशुद्धजालियातयाचा ॥विभागोहोय॥८३॥
आणिसच्छिष्यजेअसती ॥ भावेंसद्गुरूलाशरणयेती॥ तेहिहळूहळूज्ञानपावती ॥
क्रमेंकरून ॥ ८४ ॥ पाहूनियांजैसाजोअधिकारी ॥ सद्गुरुतैसाचउपदेशकरी ॥
तारीजडमूढभवसागरीं ॥ नानायुक्तीनें ॥८५ ॥ ऐसासद्गुरुमहिमाअपार ॥ जा
णोनिसच्छिष्यस्मरेउपकार ॥ विशेषभक्तीकरीनिरंतर ॥ तेंहीसांगेन॥ ८६ ॥ श्री
गोपालाश्रमरूपीगजानन ॥ ऐसेंबोलिलासद्गुरूदयाघन ॥ तेणेंपावलागोसावी
नंदन ॥ समाधान ॥ ८७ ॥ संपलेंपंचमप्रकरण ॥ जेथेंशिष्यलक्षणनिरूपण ॥
तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥८८॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसा
वीनंदनसंवादे शिष्यलक्षणनिरूपणं नाम पंचमप्रकरणं समाप्तम् ॥ ॥ ॥
श्रीरामायनमः ॥ सद्गुरुगणाधीशगजानन ॥ गोपालाश्रमरूपीदयाघन ॥ म्हणे
गोसावीनंदनासावधान ॥ ऐकआतां ॥ १ ॥ सच्छिष्यसद्गुरूचेंकरीभजन ॥ तेंको
णाप्रकारींजाण ॥ तयाचेंहिकीजेलनिरूपण ॥ सावकाश ॥ २ ॥ महिमाजाणोनि
अंतःकरणीं ॥ बैसेमानसपूजेलागुनी ॥ नानासंकल्पविकल्पसोडुनी ॥ संसारिक
॥ ३ ॥ निश्चयसद्गुरुभजनींपूर्ण ॥ सर्वदासद्गुरूचेंअनुसंधान॥ असेसद्गुरुभक्तीचा
अभिमान ॥ जयालागीं ॥ ४॥ सद्गुरुगुणऐकेनिरंतर॥जोसद्गुरुआलिंगनासादर॥

सद्गुरुमूर्तिडोळांवारंवार ॥ न्याहाळितसे ॥ ५ ॥ प्रेमेंसद्गुरुचरणांगुष्ठचोखी ॥ त्या
पुढेंअमृतहीफिकेलेखी ॥ सद्गुरुपदाब्जाविणआणखी ॥ सुगंधनघे ॥ ६ ॥ नित्यप
ठेगुरुगीतागुरुस्तोत्रें ॥ वर्णीसद्गुरूचींनानाचरित्रें ॥ मेळवूनिपूजाद्रव्येंविचित्रें ॥
अर्चनकरी ॥ ७ सद्गुरूलाकरीप्रदक्षिणा ॥ सद्गुरुपुढेंनाचेदणदणा ॥ सद्गुरुआज्ञे
विणकरीना ॥ कांहींकर्म ॥ ८ ॥ निर्लज्जहोऊनियाआपण ॥ घालिसाष्टांगनमन
लोटांगण ॥ उचंबळेप्रेमसागरपूर्ण ॥ तयेकाळीं ॥ ९ ॥ ज्यालासद्गुरूचाप्रसादभ
क्षणें ॥ सद्गुरुपादोदककरीप्राशन ॥ म्हणेमीधन्यजालोंपावन ॥ येणेंकरूनि॥१०॥
जेंकांहींकरणेंआणिभोगणें ॥ तेथेंनोहेसद्गुरूचेंविस्मरण ॥ म्हणेकर्ताभोक्तासद्गुरू
विण ॥ नसेकोण्ही ॥११॥ परमनिष्ठाधरूनिअंतरीं ॥ गुरुपादुकातीर्थस्थापीघरीं ॥
कुटुंबासहितत्यांचीबरी ॥ करीसेवा ॥ १२ ॥ सद्गुरुपादुकापूजनाविणें ॥ नकरी
सर्वथाजलप्राशन ॥ म्हणेसद्गुरुकारणींमाझाप्राण ॥ लागोंसुखें ॥ १३ ॥ म्हणे
ह्यासद्गुरूच्यापादुका ॥ वंद्यब्रह्मादिसुरवरादिकां ॥ कोण्यापुण्येंपावलोंफुका ॥ हें
नकळे ॥१४ ॥ वस्त्रेंभूषणेंअन्नपानादिक ॥ जेंआपणांपाहिजेआवश्यक ॥ तेंआधीं
अर्पितसेभावपूर्वक ॥ सद्गुरूला ॥ १५ ॥ पोषणआपल्याकुटुंबाचेपरी ॥ सद्गुरुप
रिवाराचेंकरी ॥ जोशाहणाज्याचात्यापरी ॥ व्यवहाररक्षी ॥ १६ ॥ जरींआपणा

सीशक्तिहोईना ॥ तरीइतरांसीबोधकरीनाना ॥ भलत्याप्रकारींसद्गुरुभजना ॥ ला
वितसे ॥ १७ ॥ जैसींपूज्यआपणालामातापिता ॥ त्याहूनिअधिकमानीतत्त्वतां ॥
सद्गुरुआणिसद्गुरूचीकांता ॥ भक्तीनेंजो ॥ १८ ॥ जेसद्गुरूचेसांप्रदायीअसती ॥
बंधूपरीसत्यांच्याठाईंप्रीति ॥ ह्मणेपरमार्थाचींसोयरींअसती ॥ कामायेतील
॥१९॥ ह्मणेसद्गुरुसांगेलतेंकरावें ॥त्याच्यागुणदोषातेंनपहावें॥सद्गुरुमहिमाबो
लावयाधरावें ॥ सामर्थ्यकोणें ॥ २० ॥ बालकापरीसलगीनेंवर्तत ॥ राजभृत्याहू
निमर्यादाबहुत ॥ अत्यंतसात्त्विकसुशीलशांत ॥ विरक्तजो ॥ २१ ॥ जोस्वयेंभ
क्तिकरूनिदाखवी ॥ इतरांलाभजनमार्गींलावी ॥ सद्गुरुसंप्रदायवाढवी ॥ नाना
यत्नें ॥ २२ ॥ म्हणेकांहींसद्गुरूलाअर्पिलें ॥ तेअनंतब्रह्मांडासीपावलें ॥ मूळीं
जळघालितांफलेंफुलेंचांगलें ॥ झाडजैसें ॥ २३ ॥ म्हणेपारनाहींयापुण्यास ॥ स
द्गुरूचेमुखींपडतांग्रास ॥ तेणेंचौऱ्यांशीलक्षयोनीजीवास ॥ तृप्तताहोय ॥ २४ ॥
जेंकेवळपरब्रह्मनिर्गुण॥तेंसद्गुरुरूपेंजालेंसगुण ॥ निश्चयेंभक्तांच्याउद्धाराकारणें ॥
अवतरलें ॥२५॥ सद्गुरुईश्वरावतारसाक्षात् ॥ त्यासीमनुष्यह्मणतीजेभ्रांत ॥ ते
स्वहितासीअंतरलेनिश्चित ॥ पडतीघोरीं ॥ २६ ॥ लज्जाटाकूनिसकलजनांची ॥
अहंतासांडूनिथोरपणाची ॥ करीस्वयेंसद्गुरूच्याघरींचीं ॥ निजकार्यें ॥२७॥ जे

सासमारंभहोयलग्नाचा ॥तैसासद्गुरुजयंतीचा ॥ मेळामिळवूनिहरिदासांचा ॥ उ
च्छावकरी ॥ २८ ॥ मंडपवस्त्रगृहेंगुढिया ॥ बरवेप्रकारेंउभारूनिया ॥ मिरवीत
आणीसद्रुराया॥निजमंदिरा ॥ २९ ॥ षोडशोपचारींकरीपूजनें॥सद्गुरूच्यानांवें
देनानादानें ॥ सर्वसाधुसंतब्राह्मणमिष्टान्नें ॥ तृप्तकरी ॥३०॥ म्हणेसद्गुरूदेवआ
लाघरासी ॥ जोडानाहींआजपर्वकालासी ॥ कोटिदीपावलयादसरेआम्हांसी॥ घ
डलींकीं ॥ ३१ ॥ ह्मणेआजींजीवित्वजालेंसफळ ॥ धन्यआमचेंकुळआणिशिळ ॥
सद्गुरुपरब्रह्मकेवळ ॥ आलेघरा ॥३२॥ सद्गुरूलाहोयमाझेंस्मरण॥ऐसीसेवाघ
डोकायावाचामनें ॥ तरीजन्माआलियापूर्ण ॥ सार्थकता ॥ ३३ ॥ जेणेंस्मरणहोय
सद्गुरूला ॥ ऐसीसेवाकांहींघडोमजला ॥ तरीचनिश्चयेंसीआपला ॥ सफळजन्म
॥ ३४ ॥ जरीसद्गुरुआलेग्रामांतरीं ॥ सदांनिजध्यासतयांचाकरी ॥ गाईविणजै
सेंवासरूघरीं ॥ बांधलेंखुंट्या ॥ ३५ ॥ गाईपाशींमनअसेवासराचें ॥ वासराचे
ठाईलक्ष्यगाईचें ॥ तैसेंप्रेमेंसच्छिष्याचें ॥ परस्परें ॥ ३६ ॥ सद्गुरूचाग्रामअसे
ज्यादिशेसी ॥ तेदिशालक्षीडोळांअहर्निशीं ॥ सद्गुरुवियोगसाहेनामानसीं ॥ क
ष्टीहोय ॥ ३७ ॥ देखेकोणीगुरुमार्गेयेतां ॥ प्रेमेंधावोनिअलिंगीअवचितां ॥ पुसे
सद्गुरूचीआनंदवार्ता ॥ आवडीनें ॥ ३८ ॥ सद्गुरूचीवार्षिकयात्राकरी ॥ कुटुं

बासहीतबरव्यापरी ॥ म्हणेहेंचिसार्थकआहेनिर्धारीं ॥ जन्मांआलिया ॥ ३९ ॥
सद्गुरुनगरीतेचिकाशीपुरी ॥ सद्गुरुपादोदकधारागंगाबरी ॥ केवळविश्वेश्वरसद्गु
रुनिर्धारीं ॥ तारकब्रह्म॥ ४० ॥ब्रह्माविष्णुशंकरात्मक॥निश्चयसद्गुरुचीअसेयेक ॥
येथेंवायांकरितीजेकुतर्क ॥ तेपूर्णदोषी ॥ ४१ ॥ ह्मणेसद्गुरुमहिमाअपार ॥
पार्वतीशींबोलिलाशंकर ॥ श्रुतिशास्त्रांहीअगोचर ॥ अवाच्यशेषा ॥ ४२ ॥
गुरूचरणाखालीलमाती ॥ अंगालागतांप्राणीउद्धरती ॥ म्हणऊनिअंगणींलोळेअ
ती ॥ प्रेमेंकरूनि ॥४३॥ नानापरीविनवूनिसद्गुरूसी ॥ घेऊनियेआपुल्याग्रामा
सी ॥ मेळवूनिइष्टमित्रजनांसी ॥ भक्तीसलावी ॥ ४४ ॥स्वयेंसद्गुरूचामहोत्साह
करी ॥ आणिकरवीघरोघरीं ॥ वाजतीटाळमृदंगझालरी ॥ कीर्तनेंहोती ॥ ४५ ॥
ऐसाजोकायावाचाआणिमनें ॥ जीवेंप्राणेंसर्वपदार्थेंशरण ॥ तोचिजाणावासच्छि
ष्यधन्यधन्य॥गुरुभक्त ॥ ४६ ॥ म्हणेजरीपूर्णघडेनासेवा ॥ तरीचतुर्थांशदशांशअ
र्पावा ॥ परंतुसद्गुरूसीनकरावा ॥ वंचनार्थ ॥४७ ॥ जरीहेंविशेषजालेंअसेज्ञान॥
तऱ्हीतोसद्गुरुआज्ञेविण ॥ कोण्हासीउपदेशनकरीजाण ॥ मर्यादारक्षी ॥ ४८ ॥
भलाभलाऐसेंसद्गुरुम्हणती ॥ तेव्हांविनवीमाझीनकीजेस्तुति ॥ मजपासूनिकांहीं
स्वामींचीभक्ति ॥ घडलीनाहीं ॥ ४९ ॥ सद्गुरूनेंद्यावाविशेषमान॥ सर्वदांवाणा

वेमाझेगुण ॥ ऐसेंइच्छिनासर्वथाआपण ॥ प्राणगेल्या ॥ ५० ॥ जाणेचातुर्यशास्त्र
वित्पत्ति ॥ बोलावयासीदुसराबृहस्पति ॥ परीयोग्यतासद्गुरूप्रती ॥ मिरवी
ना ॥ ५१ ॥ सद्गुरुभक्तीनेंकीर्तिव्हावी ॥ लोकांमध्येंप्रतिष्ठावाढवावी ॥ ऐसेंसर्व
थाचित्तींनभावी ॥ स्वहितींरत ॥ ५२ ॥ ज्यालासद्गुरूचीचर्चाआवडे ॥ त्यावेगळें
अन्यशास्त्रनावडे॥सद्गुरुविरहितकोणीकडे॥चित्तनेदी॥५३॥ म्यांसर्वस्वेंआर्पिलेंसद्
गुरूसी॥ऐसेंउच्चारीनाकोणापासीं॥अभ्यासिलीविद्याठेवीमानसीं॥स्फीतीभेणें॥५४॥
प्रपंचविषईंकृपणफार॥सद्गुरूचेंठाईंअत्यंतउदार ॥असोनियापरमचतुर ॥ होयवेडा
॥५५॥सद्गुरूपासींचालेहळुवार ॥जोनपाहेदृष्टिकरूनिक्रूर॥सद्गुरुदेखतांबोलेमधुर॥
सुधावाक्य ॥ ५६ ॥शरीरवाचामनेंकरून ॥ सद्गुरुघरींविक्षेपनकरणें॥ऐसादृढसंक
ल्पधरोनिजाण ॥ वर्ततसे ॥ ५७ ॥ नानाउपद्रवप्राप्तहोती ॥ तरीउचंबळेनाज्या
चीवृत्ति ॥ लाभालाभआणिनिंदास्तुति ॥ मानसिम ॥ ५८ ॥ गंभीरसमुद्राचिया
परी ॥ बरेंवाईटठेवीअंतरीं ॥ असेऐसाक्षमेनेंनिर्धारीं ॥ सद्गुरुपाशीं ॥ ५९ ॥ सक
लासीअत्यंतप्रीयमाण ॥ नाहींआपपरअनुसंधान ॥ सद्गुरुपाशींनिष्कपटपणें॥ रहा
टेसदां ॥ ६० ॥ ज्यालासद्गुरुभक्तीचीचाड ॥ आणिककांहींनिलागेगोड ॥सद्गुरु
विषईंचेंकोड ॥ असेजया ॥ ६१ ॥ सद्गुरुसंनिधमळिनपणें ॥ सर्वथाराहेनाजो

आपण ॥ सर्वदांशुचिर्भूतपूर्ण ॥ बाह्यांतरीं ॥ ६२ ॥ नानाव्यवहारींदेहवर्ततां ॥ अनेकविक्षेपहिप्राप्तहोतां ॥ परीसद्गुरूपासूनियाचित्ता ॥ चळनोहे ॥ ६३ ॥ सर्वेंद्रियेंनानापरी ॥ विषयांपासूनजोआवरी ॥ सर्वदांलावीबरव्यापरी ॥ सद्गुरुभजनीं ॥ ६४ ॥ जैसेंविषआणिवमिलेंअन्न ॥ तैसेंविषयमानीसद्गुरुविण ॥ संसारापासूनियाउदासीन ॥ सहजची ॥ ६५ ॥ मीसद्गुरूचेंकरितोंभजन ॥ माझेनिसद्गुरूनिश्चितपूर्ण ॥ ऐसाकांहींचनाहींअभिमान ॥ जयालागीं ॥ ६६ ॥ जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोष ॥ तेणेंपरमपावलोंमीक्लेश ॥ ऐसावारंवारस्मरोनिनिःशेष ॥ सद्गुरूलाभजे ॥ ६७ ॥ कांतापुत्रगृहमित्रादिसर्वही ॥ जेथेंअणुमात्रज्याचीआस्थानाहीं ॥ सद्गुरूविरहितज्यालाकांहीं ॥ गोडनवाटे ॥ ६८ ॥ सुखदुःखेंप्राप्तहोतांबहुत ॥ परीतेथेंजयाचेंसमचित्त ॥ सद्गुरुभजनींलागलाहेत ॥ तोपालटेना ॥ ६९ ॥ सद्गुरूविणप्रियकांहींनमानी ॥ कायावाचामनेंविनटेभजनीं ॥ येकदेवहाचिनिश्चयमनीं ॥ जयाचिया ॥ ७० ॥ तीर्थेंदेवस्थलेंगिरितपोवनें ॥ त्याहूनिविशेषसद्गुरूसदन ॥ ऐसेंमानूनिराहेनिशिदिन ॥ तयेठाईं ॥ ७१ ॥ सद्गुरूब्रह्मसच्चिदानंदघन ॥ तयाचेंजोडल्याअखंडदर्शन ॥ हेंचनिश्चयेंसिआहेआत्मज्ञान ॥ ऐसेंमानी ॥ ७२ ॥ सद्गुरुजीवंतअसतांजाण ॥ तयाचेंपाळितसेवचन ॥

समाधिस्थजालियापिंडदान ॥ गयेसकरी ॥ ७३ ॥ नित्यतर्पणींगुरुनामउच्चारी ॥ प्रतिवर्षींश्राद्धबरेंकरी ॥ धरोनियासद्भावअंतरीं ॥ ऐसावर्ते ॥ ७४ ॥ समाधीचेठाईरचीवृंदावन ॥ लावीअश्वत्थादिनानावृक्षजाण ॥ स्थलदेखोनिपावेविश्रांतिमन॥ साधुसंताचें ॥ ७५ ॥ गुरुवारींसाधुसंतपाचारी ॥ गुरुनामेंत्यांचेंपूजनकरी ॥ क्षीरापतीवाटीघरोघरीं ॥ सकलांसी ॥ ७६ ॥ गुरुपुत्रअथवासच्छिष्यकोणी ॥ त्यासीसद्गुरूचापटदेउनी ॥ परोपकारार्थरक्षितसेजनीं ॥ सांप्रदाय ॥ ७७ ॥ जेठाईपूर्णभक्तिऐसी ॥ स्त्रीशूद्रादिअसोनिश्चयेंसी ॥ तेजाणब्रह्मज्ञानासी ॥ अधिकारीहोती ॥ ७८ ॥ ऐसागुरुभक्तजगींधन्यधन्य ॥ ब्रह्मादिकदेवांसिहीजोमान्य ॥ अखंडब्रह्मानंदेंतृप्तपूर्ण ॥ जीताचिमुक्त ॥ ७९ ॥ संपलेंषष्ठप्रकरण ॥ जेथेंगुरुभक्तिनिरूपण ॥ बोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ८० ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसावीनंदनसंवादे ॥ गुरुभक्तिनिरूपणंनामषष्ठप्रकरणंसमाप्तमभूत् ॥ श्रीसच्चिदानंदार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ ॥ · ॥ ॥

श्रीरामायनमः ॥ तोसकलमंगळाचेंमंदिर ॥ गोपालाश्रमरूपेंसद्गुरूगणेश्वर ॥ सद्गुरूकृपेचासागर ॥ कैवल्यदाता ॥ १ ॥ म्हणेऐकआतांसावधान ॥ अनुबंधचतुष्टयलक्षण ॥ गोसावीनंदनाहेंचितूंजाण ॥ ब्रह्मज्ञान ॥ २ ॥ अधिकारीविषय

आणिसंबंध ॥ चौथेंप्रयोजनअसेप्रसिद्ध ॥ याजलाचिम्हणावेंअनुबंध ॥ चतुष्टय ॥ ३ ॥ आतांअधिकारीजीवजाण ॥ शुद्धमुमुक्षुसच्छिष्यसुलक्षण ॥ जोसाधनचतुष्टयसंपन्न ॥ सांगितलामागें ॥ ४ ॥ विषयाचेंलक्षणऐकआतां ॥ विषयशुद्धजीवब्रह्मैक्यता ॥ वेदांतशास्त्रींहेंचितत्त्वतां ॥ बोलयलें ॥ ५ ॥ आतांजीवब्रह्मैक्यताकैशी ॥ जरीआशंकाकरिसीलऐसी ॥ तरीदृष्टांतेंकरूनतुजपासी ॥ सांगतोंमी ॥६॥ कोणीयेकदहाजणमिळाले ॥ समुदायेंग्रामांतरासीचालिले ॥ सर्वआहेतकींम्हणोनमार्गींलागले ॥ मोजावयासी ॥७॥ आपणासीटाकूनिनवजणांमोजिती ॥ दहावाहरपलाऐसेंह्मणती ॥ मगभ्रमेंअत्यंतशोककरिती ॥ सकलही ॥ ८ ॥ तंवत्यामार्गेंअकस्मात् ॥ त्यावरूनचालिलाविवेकवंत ॥ त्याणेंपुसिलासर्ववृत्तांत ॥ जालाविस्मितपैं ॥ ९ ॥ त्यानेंजंवदृष्टींअवलोकिलें ॥ तंवदहाजणांसीदेखिलें ॥ मगह्मणेतुह्मींकराआपलें ॥ समाधान ॥ १० ॥ तुह्मांशीदहावाशिघ्रभेटवीन ॥ आतांशोकनकाकरूंदारुण ॥ ऐसेंऐकूनत्याचेंवचन ॥ पायांलागती ॥ ११ ॥ ह्मणेज्यानेंमोजिलेनवजण ॥ तोदाहवानिराळाआहेकोण ॥ कैसाभुललाआपणासीआपण ॥ व्यर्थचिकीं ॥ १२ ॥ ऐसीबोधितांगेलीनवमभ्रांति ॥तत्कालपावलातोदशमस्थिति॥ मगजालियाशोकाचीनिवृत्ति ॥ सहजची ॥ १३ ॥ सिद्धचोऐक्यनवमदशमाचें ॥

तैसेंसद्गुरुकरीब्रह्मैक्यसाचें ॥ क्षणनलागतांशिष्याचें ॥ अज्ञानफेडी ॥ १४ ॥
ह्मणेतूंचिसच्चिदानंदनिर्विकार ॥ असंगसर्वसाक्षीनिराकार ॥ केवलअद्वैतशुद्धचरा
चिफलजाण ॥ प्रकरणप्रतिपाद्यप्रशंसन ॥ तोचिअर्थवाद ॥ १४ ॥ मृत्पिंडज्ञानेंस
र्वमृन्मयजाणिजे ॥ तैसीप्रतिपाद्यसाधनींयुक्तिघेइजे ॥ आणित्यासीसांडूनिनित्य
संग्रहकीजे ॥ हेउपपत्ति ॥ १५ ॥ षड्विधलिंगतात्पर्यऐसेंजाणणें ॥ निःसंशयवृ
त्तिहोययेणेंश्रवणें ॥ म्हणऊनिनिरंतरकीजेश्रद्धेनें ॥ सद्गुरुमुखें ॥ १६ ॥ सकळही

वाक्येंजींअसती ॥ आत्मैक्येंब्रह्मचिबोधिती ॥ तेंचितात्पर्यधरिजेचित्तीं ॥ तेंचिश्रव
ण ॥ १७ ॥ वेदांतशास्त्रबोलेज्यावचनातें ॥ तयाचेंघेइजेपूर्णअवसानतें ॥ त्याचि
यातात्पर्यार्थातें ॥ तेंचिश्रवण ॥ १८ ॥ यास्तवयेकाग्रकरूनियामन ॥ सादरसंपा
दावेंश्रवण ॥ याविरहितजोकाळक्रमणें ॥ व्यर्थचितो ॥ १९ ॥ मुख्यतात्पर्यार्थातें
धरणें ॥ तेव्हांचितेंसफलश्रवण ॥ आणिश्रवणाचीहीहोयपूर्ण ॥ सार्थकता॥२०॥
श्रवणेंवेदगुरुप्रमाणहोय ॥ श्रवणेंबाणेसत्यमिथ्यानिश्चय ॥मनोनाशवासनेचाक्षय॥
श्रवणेंचि ॥ २१ ॥ असेब्रह्मींतात्पर्यसर्वशास्त्राचें ॥ ऐसेंश्रवणेंचिकळतसेसाचें ॥ श्र
वणाविरहितआणिककैचें ॥ थोरसाधन ॥ २२ ॥ श्रवणाविणजोअभ्यासकरणें ॥
तोसकलहीव्यर्थजाणणें ॥ तेणेंकरूनसंशयनिरसणें ॥ नव्हेकदां ॥ २३ ॥ श्रवणें
भासेप्रपंचमिथ्यामय ॥ सर्वब्रह्मऐसानिश्चय ॥ मुख्यजीवन्मुक्तीचाउपाय ॥ श्रवण
चि ॥ २४ ॥ यास्तवकीजेमहावाक्यश्रवण ॥ तेंचियेकब्रह्मप्राप्तीचेंकारण ॥ ह्मण
सीलजोअनिर्वाच्यनिर्गुण ॥ तोकेविंशब्दासिये ॥ २५ ॥ जेथेंसकलयुक्तीखुंटलि
या ॥ जेंअगम्यमनबुद्धिइंद्रियां ॥ तेंब्रह्मवाक्यश्रवणेंकरूनिया ॥ कैसेंपाविजे॥२६॥
ऐसीआशंकानधरावीमानसीं ॥ नेतिमुखेंसर्वअनात्मनिरसी ॥ तेव्हांब्रह्मसाक्षात्का
रनिश्चयेंसी ॥ होतआहे ॥ २७ ॥ म्हणोनिमहावाक्यप्रमाण ॥ येणेंचिब्रह्मसा

क्षात्कारहोयपूर्ण ॥ येठाईआतांसहसानकरणें ॥ वायांकुतर्क॥२८॥ सूर्याच्याठाईं
मिथ्याछिद्रदिसे ॥ तेव्हांमरणतेंसत्यहोतसे ॥ तैसेंमहावाक्यार्थबोधेंअनायासें ॥
पाविजेब्रह्म ॥ २९ ॥ स्वप्नस्थासीस्वप्नींच्यापुरुषानें ॥ थापटितांसत्यहोयजागेप
ण ॥ मगम्हणेमिथ्यासकळहीमिथ्यास्वप्न ॥ देखियेलें ॥ ३० ॥ तेविंअलक्ष्यहील
क्ष्यार्थपूर्ण ॥ साधतसेमहावाक्यार्थश्रवणें ॥ महावाक्यतेंसद्गुरुवचन ॥ निश्चयेंसी
॥ ३१ ॥ अकाशतोंअसोनिअपरिच्छिन्न ॥ परीउदकींभासेपरिच्छिन्न ॥ तैसेंमिथ्या
वाक्यार्थबोधवृत्तीनें ॥ आभासेब्रह्म ॥ ३२ ॥ जोसाधनचतुष्टयसंपन्न ॥ तोचिअ
धिकारीयेथेंजाण ॥ त्याजलामहावाक्यार्थश्रवण ॥ पूर्णठसावे ॥ ३३ ॥ जेव्हांअ
नुग्रहहोयईश्वराचा ॥ तेव्हांचिलाभघडेयाश्रवणाचा ॥ पूर्णभक्तजोअसेलसद्गुरूचा
तोचिमहिमाजाणे ॥ ३४ ॥ इतरठकलेदेहाभिमानें ॥ ज्यालानघडेसद्गुरूचेंसेवन ॥
तयावेडियालाहेंश्रवण ॥ प्राप्तकैंचें ॥ ३५ ॥ याप्रकारेंजाणविलेंश्रवण॥ आतांगो
सावीनंदनासांगूंमनन ॥ सद्गुरूगोपाळाश्रमगजानन ॥ बोलिलाऐसें ॥ ३६ ॥ ये
थेंसंपलेंपंचदशप्रकरण ॥ जेथेंश्रवणलक्षणनिरूपण॥तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥
यथामतीं ॥ ३७ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेश०श्रवणनिरूपणंनामपंचदशप्रक
रणंसमाप्तम् ॥ ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ जयाचेंसदांकरितांचिंतन ॥ मगकैंचेंमिथ्यासंसारभान ॥ गो
पाळाश्रमरूपीगजानन ॥ सद्गुरूतो ॥ १ ॥ म्हणेगोसावीनंदनासावधान ॥ आइ
कआतांमननाचेंलक्षण ॥ जेणेंसकळसंशयनिरसन ॥ तत्काळहोय ॥ २ ॥ मनन
म्हणजेस्वयुक्तीनेंकरणें ॥ आइकल्याअर्थाचेंदृढअनुसंधान ॥ मगसंशयाचेंनिरस
न ॥ सहजचि ॥ ३ ॥ जोकेवळअद्वैतआत्माआइकिला ॥ तेथेंदृढविश्वासज्याचाबै
सला ॥ वेदांतयुक्तीनेंविचारूंलागला ॥ तेंचिमनन ॥ ४ ॥ षड्विधलिंगतात्पर्यश्र
वण ॥ निःसंशयवृत्तिहोतसेपूर्ण ॥ यायुक्तिविचारेंनिश्चयकरणें ॥ तेंचिमनन ॥ ५॥
जरीवेदांतश्रवणेंज्ञानहोय ॥ तरीकोमळकंटकन्याय ॥ असंभावनासर्वथानजाय ॥
मननाविण ॥ ६ ॥ आत्मादेहेंद्रियाहूनविलक्षण ॥ ऐसासहस्रदांऐकिलाश्रवणें ॥
परीत्याचीभावनानाहींचपूर्ण ॥ तेअसंभावना ॥ ७ ॥ अनात्मदेहींआत्मप्रतीति ॥
आत्मत्वींदृढअनात्ममति ॥ विपरीतभावनेचीस्थिति ॥ ऐसीअसे ॥ ८ ॥ निरसे
असंभावनामननें ॥ विपरीतभावनानिदिध्यासनें ॥ यादोहींसाधनाविणश्रवण ॥
व्यर्थजाय ॥ ९ ॥ यास्तवगुरुमुखेंजालेंजेंश्रवण ॥ त्याचेंनिरंतरकरावेंमनन ॥ तेणें
करूनिहोईलनिरसन ॥ असंभावनेचें ॥ १० ॥ प्रथमयेकप्रमाणासंभावना ॥ आ
णिदुसरीप्रमेयासंभावना ॥ याप्रकारींअसेअसंभावना ॥ द्विविधपणें ॥ ११ ॥ गुरु

शास्त्रवाक्यअप्रमाणमानणें ॥ तेचिप्रमाणासंभावनाजाणणें ॥ आणिआत्मप्रमेयीं
कुतर्ककरणें ॥ तेप्रमेयासंभावना ॥ १२ ॥ श्रवणेंप्रमाणासंभावनाजाय ॥ गुरुशा
स्त्रवाक्यींदृढविश्वासहोय ॥ मननेंमीब्रह्महाबाणतोनिश्चय ॥ नासेप्रमेयासंभावना
॥ १३ ॥ म्हणऊनिप्रमेयासंभावनेसी ॥ निरसावयाप्रवर्तावेंमननासी ॥ मीब्रह्म
ऐसेंआणिजेप्रत्ययासी ॥ शास्त्रयुक्तीनें ॥ १४ ॥ सर्वदांवेदांतशास्त्रयुक्तीनें ॥ किजे
आत्मयाचेंअनुचिंतन ॥ सर्वसंशयातेंदूरकरणें ॥ त्याचेंनांवमनन ॥ १५ ॥ मनवा
सनेचाअभावश्रवणें ॥ सहजचिबाणेआत्मानुभवपूर्ण॥परीदृढनिश्चयालागींयुक्तीनें ॥
कीजेमनन ॥ १६ ॥ तेंआत्ममननकरावेंकैसें ॥ कदांचित्म्हणसीलजरीऐसें ॥ तें
हीआतांसांगोंअनायासें ॥ तुजलागीं ॥ १७ ॥ नित्यशुद्धबुद्धमुक्तनिर्गुण ॥ अद्वै
तानंदसच्चिदानंदघन ॥ असंगसर्वसाक्षीनिरंजन ॥ निर्विकार ॥ १८ ॥ देशकाळ
वस्तुपरिच्छेदातीत ॥ मीकेवळआदिमध्यांतरहित ॥ परात्परब्रह्मपूर्णअखंडित ॥
भेदत्रयशून्य ॥ १९ ॥ ऐसामीअचिंत्यअव्यक्तसनातन ॥ कैसाभुललोंहोतोंआप
णाआपण ॥ आत्मानात्मविवेकेंनिजठिकाण ॥ पावलोंआतां ॥ २० ॥ जंवआत्मा
नात्मविवेकनव्हता ॥ तंववरीचभ्रांतहोतोतत्त्वतां॥पूर्णब्रह्मानंदानुभवआतां॥सद्गुरुप्र
सादें॥२१॥देहत्रयासहितविश्वनिरसितां॥पावलोंपृथक्आणिविषेषात्मता ॥ऐसीशा

स्त्राचार्योपदेशकौशल्यता॥धन्यधन्य॥२२॥शुद्धस्वरूपाचेंजेंविस्मरण ॥ त्याचिअज्ञा
नेंसंसारदारुण ॥ विचारेंपाहतांसर्वमिथ्याभान ॥ स्वप्नवत् ॥ २३ ॥ अज्ञानयोगें
जीज्ञानाचीविरोधी ॥ कैसीआडआलीहोतीदेहबुद्धि॥तिनेंभासविलीसंसारउपाधि ॥
नसतीच ॥ २४ ॥ गुरुश्रवणेंहोतांआत्मज्ञान ॥ देहबुद्धिसाहितगेलेंअज्ञान ॥ आ
तांमीकेवलआत्माचैतन्यघन ॥ सिद्धचिअसें ॥ २५ ॥ पृथ्वीआपतेजवायुगगन ॥
आणिदेहेंद्रियअंतःकरण ॥ यासकळांहूनिमीविलक्षण ॥ साक्षीआत्मा ॥ २६ ॥
अनादिअज्ञानेंठकिलेंमातें ॥ मीदेहऐसेंमानिलेंहोतें ॥ आतांम्यांबरवेंआपणातें ॥
वोळखिलें ॥ २७ ॥ जेंपरप्रकाश्यदेहादिकदृश्य ॥ तयाचाहोतसेप्रत्यक्षनाश ॥
मीअविनाशपूर्णस्वप्रकाश ॥ निरुपाधिक ॥ २८ ॥ जेंकांहींऐकिजेदेखिजे ॥ इंद्रि
येंकरूनियाघेइजे ॥ तेंसर्वमिथ्याजाणिजे ॥ माझ्याठाईं ॥ २९ ॥ मीसर्वदेशींसर्व
काळींअसें ॥ मजहूनिकांहींदुजीवस्तुनसे ॥ आकाशाचीहीउपमामिथ्याभासे ॥
त्यासीवस्तुपरिच्छेद ॥ ३० ॥ अविचारेंहोयविश्वींद्वैतप्रतीति ॥ विचारेंपाहतांअव
घीभ्रांति ॥ विश्वचिनाहींऐसीस्वानुभवस्थिति ॥ अखंडित ॥ ३१ ॥ जेविंअविचा
रेंरज्जुभासेव्याळ ॥ किंवारश्मीच्याठाईंमृगजळ ॥ मिथ्यारजतपणेंशुक्तिकेवळ ॥
झळझळी ॥ ३२ ॥ तैसेंमाझ्याठाईंद्वैतपणें ॥ जेंभ्रमेंहोतेंसकळविश्वभान ॥ तेंचि

विचारितांमजहूनिभिन्न ॥ नाहींआतां ॥३३॥ समुद्राचेअनेकतरंगाकार ॥ येकसु
वर्णचिनानाअलंकार ॥ त्यापरीमीचआहेंचराचर ॥ सकलही ॥ ३४ ॥ जेंजडप
रमचैतन्यपावेविकार ॥ तयेमिथ्याप्रतीतीहूनिमीपर ॥ नित्यस्वतंत्रचालकसाचार ॥
बोधरूप ॥ ३५ ॥ मीनित्यानंदपावेनाविकारांसी ॥ आपल्यापूर्णत्वेंनदेखेंद्वैतासी॥
मजसीआणिमिथ्यादेहादिकांसी ॥ संबंधनाहीं ॥ ३६ ॥ मीदेहादिसर्वदृश्यप्रका
शक ॥ तयासीसंबंधमिथ्याअध्यासिक ॥ जैसेअलंकारआणिकनक ॥ तयांप
री ॥ ३७ ॥ पूर्वसंस्कारेंचेष्टेशरीर ॥ करितसेसकलव्यापार ॥ परंतुतयाचासाक्षी
मीनिर्विकार ॥ नामरूपातीत ॥ ३८ ॥ इतरांचादेहभिन्नपणेंकैसा ॥ प्रत्यक्षनय
नींदेखतसाजैसा ॥ मीआपलादेहमानितसेंतैसा ॥ परकीयत्वें ॥ ३९ शरीराचेंक
र्मसुखदुःखकांहीं ॥ विचारेंपाहतांमाझेठाईंनाहीं ॥ केवलमीआत्मासाक्षित्वेंचदे
हीं ॥ वर्ततसें ॥ ४० ॥जोदृश्यमनबुद्धिइंद्रियादिक ॥ प्रपंचभासतसेसकळिक ॥ तो
केवळचिद्विलासतदात्मक ॥ तयापरी ॥ ४१ ॥ जोज्याचाविलासतोतद्रूपचिअसे ॥
सत्यअधिष्ठानींचविपरितभासे ॥ तोमिथ्याभ्रममात्रशाश्वतनसे ॥ कालत्रईं ॥४२॥
जैसाआपणयेकसत्यअधिष्ठान॥आपलाविलासमिथ्याभासेस्वप्न ॥ तैसेंशाश्वतब्रह्मीं
अशाश्वतभान ॥ प्रपंचाचें ॥ ४३ ॥ जैसारज्जूच्याठाईंसर्पभासत ॥ किंवाशुक्तिच

विलासरजत ॥ जेंज्याठाईंभासेविपरीत ॥ तेंतदात्मक ॥ ४४ ॥ तैसेंसकलदृश्य
देहादिक ॥ ब्रह्मींचाविलासब्रह्मात्मक ॥ त्याव्यतिरिक्तनाहींआणिक ॥ दुजेंकां
हीं ॥ ४५ ॥ विवेकेंकरितांअवलोकन ॥ सत्ययेकअसेअधिष्ठान ॥ भ्रांतीनेंहोयदृ
श्यविलासभान ॥ तेंमिथ्याभूत ॥ ४६ ॥ आज्ञानेंसकलहीभासतहोतें ॥ तेंचिज्ञा
नेंकरूनिपावलेंनाशातें ॥ जैसाजागृतजालियास्वप्नातें ॥ नदेखिजे ॥ ४७ ॥ याबो
धेंमीब्रह्मसच्चिदानंदघन ॥ ऐसेंनव्हतेंअपरोक्षज्ञान ॥ तोंवरीचहोतेंदीर्घकाळभान॥
प्रपंचाचें ॥ ४८ ॥ आतांपूर्णअपरोक्षानुभव ॥ जेणेंसकलदृश्याचाअभाव ॥ मी
अद्वितीयस्वयमेव ॥ स्वसंवेद्य ॥ ४९ ॥ मीसर्वथानव्हेंमिथ्यादेहवत् ॥ केवलब्र
ह्मनित्यानंदभरित ॥ म्हणऊनिमजलानाहींनिश्चित ॥ संपत्तिविपत्ति ॥ ५० ॥ वि
पत्तिजालियाचंचलहोइना ॥ मीसंपत्तिप्राप्तीनेंउचंबळेना ॥ नदेखेंयेकआत्मस्थिति
विना ॥ दुजेंकांहीं ॥ ५१ ॥ मीदेहेंद्रियाहूनिविलक्षण ॥ सहजचिभावविहीन ॥
माझ्याठाईंतापत्रयाचेंभान ॥ कैंचेंआतां ॥ ५२ ॥ मीकालत्रयींनेणेंमायाजाळ ॥
मिथ्यादेहासीलागलेंसकळ ॥ मीत्याचासाक्षीअसेंनिर्मळ ॥ विचारितां ॥ ५३ ॥
कर्मकरितांदेहेंद्रियचंचळ ॥ मीतंवसर्वांचाप्रकाशकअचळ ॥ जैसातोदीपसाक्षीमात्र
केवळ ॥ तैसाअसें ॥ ५४ ॥ मजलाआशाचिनाहींनिपट ॥ तीचिकर्मकर्तव्यतास्वट

पट ॥ मिथ्याभूतदेखेंदेहासगट ॥ सकळविश्व ॥ ५५ ॥ जाणतांसर्वमिथ्यामृगज
ळवत् ॥ तेव्हांवासनाउपजेनानिश्चित ॥ मीनिस्पृहअकर्तासभराभरित ॥ नभापरी
॥ ५६ ॥ असेंसकळवासनाविहीन ॥ नाहींमजकर्मकर्तव्यपण ॥ म्हणऊनिशांत
अरूपनिर्गुण ॥ मीसाक्षीआत्मा ॥ ५७ ॥ जेंकांहींआलेंमिथ्यारूपासी ॥ तेंचिना
शिवंतचळनिश्चयेंसी ॥ मीअविनाशअचळसर्वांसी ॥ व्यापूनिअलिप्त ॥ ५८ ॥ पं
चभूतेंआणिभुवनत्रय ॥ तेंमीचअसेंअवघेंचिन्मय ॥ मजविणकांहींचभिन्ननिश्चय ॥
उरलेंनाहीं ॥ ५९ ॥ विचारितांहेंविश्वसकलिक ॥ केवळआत्मासत्तामात्रात्मक ॥
जैसापटाचाकरितांविवेक ॥ तंतूचियेक ॥ ६० ॥ जैशीअंतस्थशर्कराइक्षुरसीं ॥
तेणेंकरूनितयातेंव्याप्तिकैशी ॥ तैसेंविश्वमाझ्याठाईंमीतयासी ॥ व्यापूनिअसें॥६१॥
मीसकळदृश्याहूनिअतीत ॥ आणिअसेंसर्वांच्याअंतर्गत ॥ मीआत्माकोठूनिनाहीं
व्यावृत ॥ अनुगतहीनसें ॥ ६२ ॥ विश्वमिथ्यातेथेंब्रह्मअनुगत ॥ हेंतोंकालत्रईंघ
डेनानिश्चित ॥ पूर्णआत्मासर्वातीत ॥ कैंचव्यावृत्ति ॥ ६३ ॥ मीआत्मासर्वातीत
सर्वव्यापक ॥ सिद्धचिपूर्णचिदावकाशयेक ॥ मजविरहितनाहींचआणिक ॥ कार
णजगासी ॥ ६४ ॥ मीज्ञानाब्धिमाझ्याठाईंजीवलहरी ॥ असंख्यभासतीउल्हास
तीनिर्धारीं ॥ उत्पत्तिस्थितिलयहीमजमाझारीं ॥ पावताती ॥ ६५ ॥ लहरीविका

शेंसिंधुनिश्चित ॥ तैसाचिस्वपणेंमीचशाश्वत ॥ माझ्याठाईंनाहींचदुसरीमात ॥ मी
चमोस्वयें ॥ ६६ ॥ मीसुखसमुद्रपरिपूर्णअसें ॥ माझ्याठाईंविश्वचीकल्पनाभासे ॥
परीपहातांमजहूनितेंनसे ॥ भिन्नपणें ॥ ६७ ॥ विश्वाच्याउदयेंमजवृद्धिनाहीं ॥
त्याचाअस्तहोतांनपवेक्षयही ॥ जैसासिंधुलहरीहोतांजातांकांहीं ॥ नव्हेन्यूनपूर्ण
॥ ६८ ॥ मीतंवअक्षईंजैसातैसासाच ॥ माझेनिआज्ञानेंउदयोविश्वाचा ॥ आणिल
यहीहोतसेतयाचा ॥ माझ्याज्ञानें ॥ ६९ ॥ मोअपरोक्षसच्चिदानंदघन ॥ सर्वभू
तांतरस्थसर्वगतपूर्ण ॥ ऐसेंकेवळप्रत्यग्रूपचैतन्य ॥ नित्यमुक्त ॥ ७० ॥ देहेंद्रि
यादिदृश्यनिरासें ॥ सिद्धचिप्रत्यक्स्वयंप्रकाशें ॥ तयामजलामीकरितसें ॥ नम
स्कार ॥ ७१ ॥ ऐशायुक्तीनेंकीजेआत्ममनन ॥ होयप्रमेयासंभावनानिरसन ॥
आणिवासनाक्षयमनोनाशन ॥ याचियोगें ॥ ७२ ॥ जेव्हांक्षीणहोयवासनामन॥
तेव्हांसहजबाणेआत्मत्वपूर्ण ॥ म्हणोनिकरावेंआत्ममनन ॥ निरंतर ॥ ७३ ॥
गोसावीनंदनाजाणविलेंमनन ॥याजपुढेंसांगेननिदिध्यासन ॥ गोपाळाश्रमरूपीग
जानन ॥ बोलिलाऐसें ॥ ७४ ॥ संपलेंषोडशप्रकरण ॥ जेठाईंआत्ममननिरूप
ण ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ७५ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे
गणेशगोसावीनंदनसंवादेषोडशप्रकरणं समाप्तम् ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ज्यादेवाचाकरितांसदांनिजध्यास ॥ कैंचामिथ्याअविद्याविपरीत
भास॥गोपालाश्रमगणेशसद्गुरूजगन्निवास॥सद्गुरूतो॥१॥म्हणेऐकेंगोसावीनंदना॥
सांगेनतुजखुणा ॥ तेणेंकरूनिविपरीतभावना ॥ दूरीहोय॥२॥असंभावनागेलीश्रव
णमननें ॥ विपरीभावनानासेनिदिध्यासनें ॥ निदिध्यासनम्हणिजेसर्वदाकरणें ॥
आत्मध्यान ॥ ३ ॥ आत्मध्यानाचेंहिऐसेंहेंचिलक्षण ॥ नानादृश्याकारअन्यवृत्ति
गाळणें ॥ आत्माकारवृत्तीचाप्रवाहकरणें ॥ अनुस्यूत ॥ ४ ॥ मिथ्यादेहादिकांचा
अध्यासटाकणें ॥ मीसाक्षीआत्मासर्वांहूनिविलक्षण ॥ ऐसेंअखंडितजेंअनुसंधान॥
तेंचिनिदिध्यासन ॥ ५ ॥ निरसूनिदेहादिकविजातीय ॥ केवलआत्मासच्चिदानंद
मय ॥ तोमीचऐशीभावनासजातीय ॥ करावीदृढ ॥ ६ ॥ विजातीयदेहादिप्रत्यय
रहित ॥ अद्वितीयवस्तुसजातीयशाश्वत ॥ तत्प्रत्ययप्रवाहअखंडित ॥ तेंचिनिदि
ध्यासन ॥ ७ ॥ मीआत्माऐसाश्रवणमननें ॥ दृढनिश्चयकरूनियाजाणणें ॥ मगपु
नःपुन्हांत्याचेंकोजेध्यान ॥ तेंचिनिदिध्यासन ॥ ८ ॥ जैसेंयथार्थशुक्तिसकलज्ञान॥
कैंचेंमिथ्याविपरीतरजतभान ॥ तैसोदूरहोतसेनिदिध्यासनें ॥ विपरीतभावना
॥ ९ ॥ म्हणऊनिस्वस्वरूपवोळखावें ॥ अखंडआत्मानसंधानींरहावें ॥ देहात्मबु
द्धिअविद्येलानिरसावें ॥ लागवेगीं ॥ १० ॥ बरायेकांतसेवावानिरंतर ॥ देहादि

दृश्याचाकरावातिरस्कार ॥ निजात्मरूपजेंनिर्विकार ॥ तद्रूपरहावें ॥ ११ ॥ स्थूललिंगदेहाहूनिविलक्षण ॥ देहद्वयदृश्यपरिच्छिन्न ॥ याचाद्रष्टामीआत्माअपरिच्छिन्न ॥ ज्ञानघन ॥ १२ ॥ देहद्वयाचेंजाणतेंनिखिलज्ञान ॥ तेंचिमीआकाशवत् परिपूर्ण ॥ ऐसियाअनुसंधानेंप्रपंचभान ॥ मिथ्याभासे ॥ १३ ॥ जेंकांहींग्राह्यअसेइंद्रियांसी ॥ तेंसर्वथामिथ्यानिश्चयेंसी ॥ त्याचाप्रकाशकजोअविनाशी ॥ प्रत्यगात्मा ॥ १४ ॥ प्रत्यक्ह्मणजेसाक्षीचैतन्य ॥ जोव्यापकनिःसंगचिद्गगन ॥ तदाकारकरावेंदृढमन ॥ अखंडित ॥ १५ ॥ साक्षीस्वरूपसिद्धचिपूर्ण ॥ तेंप्रत्ययासीनयेभ्रांतीनें ॥ आत्मोन्मुखकरितांचिमन ॥ मगस्वयेंचिब्रह्म ॥१६ ॥ जेणेंकरूनिचकळेसकळ ॥ तेथूनिनानावृत्तिउठतीप्रबळ ॥ तोचिकेवळसाक्षीरूपअचळ ॥ तद्रूपमनकीजे ॥ १७ ॥ दृश्यत्वेंसकलहीप्रपंचजात ॥ किंवाचित्ताचियावृत्तिअनंत ॥ जेंस्फुरेस्वस्वरूपाविरहित ॥ तेंविजातीयसांडी ॥१८॥ भिन्नभिन्नपदार्थाकारजेंजेंज्ञान ॥ त्यादृश्यप्रत्ययासीम्हणेजेंस्फुरण ॥ तेंसोडूनियाआत्माकारकरणें ॥ चित्तवृत्ति ॥ १९ ॥ मध्येंपडोंनद्यावेंव्यवधान ॥ स्फुरतांविजातीयवृत्तिजाण ॥ म्हणिजेपदार्थाकारजेंस्फुरण ॥ तेंआत्माकारकीजे ॥ २० ॥ जेंज्ञानरूपस्फुरणअसेस्वभावें ॥ तेंइंद्रियविषयाकारहोऊंनद्यावें ॥ आत्मचिंतनयाजलाचिम्हणावें ॥ निदिध्या

सन ॥ २१ ॥ जीसजातीयब्रह्माकारवृत्ति ॥ तिचाप्रवाहकीजेबरव्यारीतीं ॥ तैल
धारेपरीअंखडस्थिति ॥ तेंनिदिध्यासन ॥ २२ ॥ म्हणऊनिअतिसावधपणें ॥ बु
द्धीच्याठाईंअवलोकणें ॥ स्थिरवृत्तीनेंसाक्षात्करणें ॥ आत्मरूप ॥ २३ ॥ बुद्धी
चेंनिश्चयरूपत्वटाकिजे ॥ मगकेवलचैतन्यअनुभविजे ॥ बुद्धिस्वच्छम्हणोनितेथेंजा
णिजे ॥ ब्रह्मींअभिव्यक्त ॥ २४ ॥ ध्यानसंस्कारीतअंतःकरण ॥ तेणेंकरूनियासा
क्षात्करणें ॥ जेंबुध्यादिकांचेंप्रकाशकपूर्ण ॥ प्रत्यक्चैतन्य ॥ २५ ॥ जडपदार्था
चासूक्ष्मशोधघेतां ॥ दृश्यनामरूपासीबाधदेतां ॥ शेषचिन्मात्रसाधतसेतत्त्वतां ॥
सिद्धचिमग ॥ २६ ॥ माझ्याठाईंनाहींबुद्धींद्रिय ॥ याव्यतिरेकेंशुद्धात्मस्मरणहोय॥
मीसकलांचाप्रकाशकचिन्मय ॥ ऐसाअन्वयोचिंतिजे ॥ २७ ॥ भावितांसकलही
स्वप्नवत् ॥ जोनामरूपव्यवहारमिथ्याभूत ॥ मीसाक्षीऐसीस्थितिहोयअखंडित ॥
तेंनिदिध्यासन ॥ २८ ॥ प्रत्यक्षमिथ्यामीमाझेंअसेंम्हणतां ॥ त्याअहंममवृत्तीचा
मीजाणता ॥ असेचिन्मात्रस्थितीचीअखंडता ॥ तेंनिदिध्यासन ॥ २९ ॥ मजआ
धींविश्वजालेंचनाहीं ॥ पुढेंहोयनामध्येंनसेकांहीं ॥मीचिन्मात्रऐसालवलाहीं ॥ बो
धअभ्यासावा ॥ ३० ॥ रूपदृश्यसाक्षित्वेंअसतीनयन ॥ नयनदृश्यतेव्हांसाक्षित्वें
असेमन ॥ मनादिदृश्यसाक्षित्वेंआत्माचिद्घन ॥ तोमीऐसेंभावावें ॥३१॥ प्रथमवृ

त्तीचात्यागजाल्याबरवा ॥ दुजेवृत्तीचाउदयोहोऊंनद्यावा ॥ मध्येंनिर्विकल्पस्थिती
चावाढवावा ॥ दृढाभ्यास ॥ ३२ ॥ मुख्यमीपणाच्यामुळेंअवलोकितां ॥ अंतरींनिः
सीमचिदवकाशआयता ॥ तद्रूपहोऊनिअसणेंतत्त्वतां ॥ तेंचिनिदिध्यासन ॥३३॥
स्वरूपींअखंडसावधअसतां ॥ सकलहीवृत्तिनासतीतत्त्वतां ॥ मगसहजचिबाणेस्व
रूपता ॥ तेंचि० ॥ ३४ ॥ बुद्धिइंद्रियद्वारास्वरूपज्ञानमय ॥ बाह्यनानापदार्थींसंच
रतसेस्वयें ॥ त्याचिमार्गींअंतरींपरततांनिश्चय ॥ निजात्मस्थितिपाविजे ॥ ३५ ॥
सुखउपजेविषयसंयोगें ॥ तैसेंचिजरीराहेविषयत्यागें ॥ तरीतेंचिआत्मसुखसाधि
जेवेगें ॥ तेनिजात्मास्थितिपाविजे ॥ ३६ ॥ सर्वहिदृश्यपदार्थांचेंजेंज्ञान ॥ तेंचिजा
ल्यादृश्यपदार्थाविहीन ॥ मगकेवलत्याचेंअनुसंधान ॥ तेचिनिजात्मस्थितिपाविजे
॥ ३७ ॥ घटपटादिपदार्थनिरसितां ॥ जेंकेवळआहेपणउरेतत्त्वतां ॥ दृढतेंचिअ
भ्यासिजेनिखळता ॥ तेंचि० ॥ ३८ ॥ जेथेंसकळपदार्थांचेंनाहींपण ॥ नाहींपण
जाणिजेज्याज्ञानें ॥ तेंचिब्रह्ममीऐसाअभ्यासकरणें ॥ तेंचि० ॥ ३९ ॥ सकळदृ
श्याचेंजाल्यानिसन ॥ तेव्हांसहजचीनुरेद्रष्टेपण ॥ मगअचळस्थितींजेंतद्रूपहोणें ॥
तेंचि० ॥ ४० ॥ दृश्याचेंसांडणेंमांडणेंसांडावें ॥ केवळज्ञानस्वरूपअनुभवावें ॥ ऐ
सियास्थितीनेंनिवांतरहावें ॥ तेंचि० ॥ ४१ ॥ जडज्ञानतेंविषयस्फुरण ॥ अजडज्ञा

नतेंकेवळद्रष्टेपण ॥ अभ्यासिजेदोहींचेंप्रकाशकज्ञान ॥ तेचि० ॥ ४२ ॥ आशंका
विरहितनिघटपणें ॥ तेथेंनाहींजाणणेंआणिनेणणें ॥ ऐशियाचित्स्वरूपींतन्मयराह
णें ॥ तेचि० ॥४३॥ सत्यनिजात्मस्वरूपाचियाज्ञानें ॥ मिथ्याप्रपंचनदेखिजेमनें ॥
तेचिब्रह्मस्थितिअभ्यासणें ॥ तेचिनिजात्म० ॥ ४४ ॥ अस्तिआणिनास्तिपक्षद्वय॥
त्याविरहितजेंस्वप्रकाशअद्वय ॥ तयाआत्मस्वरूपींहोइजेतन्मय ॥ तेचिनिजात्म
स्थितिजाणिजे ॥ ४५ ॥ दृश्यद्रष्टादर्शनाविरहित ॥ जेंपूर्वींचअसेस्वप्रकाशवंत ॥
तेठाईंसमरसव्हावेंनिश्चित ॥ तेचि० ॥ ४६ ॥ जेव्हांजागृत्यवस्छेचाप्रांत ॥ आ
णिसुषुप्तीचाप्रवेशहोत ॥ तेंचिआत्मसुखसाधिजेअखंडित ॥ तेचि० ॥ ४७ ॥ लया
पासूनियाउठणें ॥ विक्षेपावरीहीनयेणें॥मध्येंजेस्थितितन्मयरहाणें ॥ तेचि०॥४८॥
एकाग्रचिंतननघडेनिर्धारें ॥ तरीवेदांतचर्चाकीजेपरस्परें ॥ अथवाकीर्तनसंपादूनि
याबरें ॥ ब्रह्मैक्यसाधावें ॥ ४९ ॥ जरीनिर्गुणींएकाग्रतानपाविजे ॥ तरीमहावा
क्यें शुद्धपदार्थघेइजे ॥ पुनःपुन्हांभागत्यागलक्षणाविचारिजे ॥साधिजेब्रह्मैक्य॥५०॥
निःशेषदेहात्मजावयाकारणें ॥ म्हणऊनिनिदिध्यासनकरणें ॥ येव्हवींनिर्गुणींन
घडेसाधन ॥ सर्वथाजाणपा ॥ ५१ ॥ विपरीतभावनाजायजोंवरी ॥ निदिध्यास
नकरावेंतोंवरी ॥ पक्कजाल्याअंगींबाणेसमाधिबरी॥गोसावीनंदना ॥५२॥आतांसां

गूंसमाधीचेंहीलक्षण ॥ असेंअमृतवाक्यवदलाकृपेनें ॥ गोपालाश्रमरूपीगजानन॥
सद्गुरूतो ॥ ५३ ॥ येथेंसंपलेंसप्तदशप्रकरण ॥ जेथेंनिजध्यासलक्षणनिरूपण ॥
तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ५४ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे गणेश
गोसावीनंदनसंवादे सप्तदशप्रकरणं समाप्तम् ॥ ॥ ॥ ॥
श्रीरामायनमः ॥ ज्याच्याकृपेनेंबाणेसहजसमाधि ॥ गोपालाश्रमगजाननसुखा
ब्धि ॥ जोकांसकलहीसमाधानाचीअवधि ॥ सद्गुरूतो ॥ १ ॥ म्हणेगोसावीनंद
नापरिसावें ॥ आतांसमाधीचेंलक्षणबरवें ॥ तेणेंकरूनिसमाधानपावावें ॥ अखंडि
त ॥ २ ॥ श्रवणमनननिदिध्यासन ॥ ऐशींतिन्हींअंतरंगसाधनें ॥ निदिध्यासन
परिपक्वजाण ॥ तेचिसमाधि ॥ ३ ॥ नामरूपात्मकदृश्यउपेक्षावें ॥ सच्चिदानंद
स्वरूपींतत्परव्हावें ॥ बाह्यअथवाअंतरींअनुभवावें ॥ तेचिसमाधि ॥ ४ ॥ समा
धीचींरूपेंदोनअसती ॥सविकल्पआणिनिर्विकल्पबोलती ॥ त्याचेंनिरूपणकरूंबरवे
रीतीं॥सविस्तर॥५॥मिथ्याद्वैतवृत्तीचाभासहोतां॥भंगेनाअद्वैतबोधअखंडता॥तोचिस
माधिसविकल्पतत्त्वतां॥प्रसिद्धजो ॥६॥जेथेंस्फुरेदृश्यद्रष्टादर्शन॥ज्ञेयज्ञाताज्ञानत्रिपु
टीजाण ॥सविकल्पसमाधीचेंलक्षण ॥हेंचिबापा ॥ ७ ॥ जेस्फुरतांहीत्रिपुटीकैसी ॥
भंगनव्हेस्वरूपस्थितीसी ॥ सविकल्पसमाधिनिश्चयेंसी ॥ तोचिजाण ॥ ८ ॥

दृश्यद्रष्टादर्शनज्ञेयज्ञाताज्ञान ॥ यत्रिपुटीचेंजेथेंनाहींस्फुरण॥हेंचिनिर्विकल्पसमाधी
चेंलक्षण ॥ जाणावेंगा ॥ ९ ॥ अखंडस्वरूपप्रत्ययाचीसिद्धि ॥ सकलहिसंकल्पा
चीअवधि ॥ तोचिकेवलनिर्विकल्पसमाधि ॥ वोळखिजे ॥ १० ॥ आतांसमाधिअ
सेषड्विधप्रकारीं॥दोन्हींनिर्विकल्पआणिसविकल्पकचारी॥येकनिर्विकल्पदोन्हीसवि
कल्पअंतरीं॥तैसेचिबाहेरतीन ॥११॥ऐसिसमाधिषड्विधपणें॥अंतरींतीनबाहेरतीन॥
अंतरींसविकल्पद्विविधजाण॥ तोसांगूंआधीं॥१२॥दृश्यानुविद्धआणिशब्दानुविद्ध॥
ऐसाअंतरींसविकल्पद्विविध ॥ आतांप्रथमजोदृश्यानुविद्ध ॥ तोऐकपा ॥ १३ ॥ का
मादिकमनोवृत्तिदृश्यकरणें ॥ तत्साक्षीआत्मामीऐसीधारणाधरणें ॥ हादृश्यानुवि
द्धसमाधिअंतरींजाण ॥ सविकल्पक ॥१४॥ मीस्वप्रकाशकअहमादिवृत्तिरहित ॥
असंगसच्चिदानंदद्वैतवर्जित॥ऐसाभावतोशब्दानुविद्धनिश्चित ॥ समाधिअंतरींदुजा
॥१५॥अंतरींसविकल्पदोनीयाप्रकारीं॥तिसरानिर्विकल्पसमाधिजोअंतरीं॥तयाचेंही
लक्षणआतां अवधारीं॥एकाग्रचित्तें॥१६॥केवळपूर्णस्वानुभवरसास्वादता॥दृश्यशब्दा
नुविद्धदोन्हीउपेक्षतां॥निर्वाताचलदीपवत्भावतत्त्वतां॥तोनिर्विकल्पसमाधि॥१७॥हे
अंतरींचेसमाधिसांगितलेतीन॥ तैसेचबाह्यतीनआईकसावधान॥दृश्यानुविद्धशब्दानु
विद्धदोन्हीजाण ॥ तिसरानिर्विकल्प ॥ १८॥ सहजहिशब्दादिकजेविषय॥तेथेंकेव

ळअसेअस्तिभातिप्रिय ॥ तेंचिभावावेंत्यागूनिनामरूपद्वय ॥ तोबाह्यदृश्यानुविद्ध
॥ १९ ॥ सर्वब्रह्मसमाधिशब्दानुविद्ध ॥ याबोधेंकांहींचनभासेदृश्यभेद ॥ तोचिबा
ह्यसमाधिशब्दानुविद्ध ॥ सविकल्प ॥ २० ॥ निर्वातस्थितदीपवत्जाण ॥ स्सा
स्वादेंनिश्चेष्टअवस्थान ॥ बाह्यनिर्विकल्पसमाधीचीखुण ॥ तेचिबापा ॥ २१ ॥ बा
ह्यांतरसविकल्पचतुर्विधपणें ॥ निर्विकल्पबाह्यांतरीयेकचिजाण ॥ सविकल्पा
भ्यासेंपरिपक्कतापूर्ण ॥ तोचिनिर्विकल्प ॥ २२ ॥ अंतरींसाक्षीतोचिबाह्यभेदशून्य
त्वें ॥ म्हणऊनिसर्वचिद्विलासतन्मयत्वें ॥ याबोधेंसविकल्पनिर्विकल्पभिन्नत्वें ॥ नु
रेकांहीं ॥ २३ ॥ सविकल्पसमाधितोसंप्रज्ञात ॥ निर्विकल्पसमाधिअसंप्रज्ञात ॥
दोन्हीषड्विधप्रकारेंअवगत ॥ केलेतुज ॥ २४ ॥ ऐसीसुषुप्तिताटस्थअवस्थाअसे ॥
तयापरीनिर्विकल्पसमाधिदिसे ॥ परंतुदोन्हीहूनिविलक्षणविलसे ॥ आत्मासाक्षा
त्कारें ॥ २५ ॥ सुषुप्तींतनसेकांहींपदार्थभान ॥ परीतेथेंअसेकेवळअज्ञान ॥ तेंवि
स्मरणनव्हेमोक्षाचेंकारण ॥ आत्मज्ञानाविणें ॥ २६ ॥ जेंनिजात्मज्ञानयेकशाश्व
त ॥ मिथ्याप्रपंचअध्यस्तअज्ञानासहित ॥ ऐसेंजाणावेंतेंविस्मरणानिश्चित ॥ मो
क्षाचेंकारण ॥ २७ ॥ सगुणमूर्तीचेंकरीचिंतन ॥ आणिलयलक्षमुद्रादियोगजाण॥
ताटस्थहोतसेतेणेंअज्ञान ॥ दूरीनव्हे ॥ २८ ॥ तैसाचअष्टांगयोगसाधिती ॥ परी

आत्मज्ञानाचीतेथेंविस्मृति ॥ सर्वथाअज्ञानाचीनव्हेनिवृत्ति ॥ तेव्हांमोक्षकैंचा ॥ २९ ॥ तेथेंताटस्थतेचालेखाकिती ॥ तेसमाधिकेवळमूर्खमानिती ॥ सत्यमिथ्यानिश्चयेंउन्मनिस्थिति ॥ तेचिसमाधि ॥ ३० ॥ षड्विधसमाधिअभ्यासिजेयास्तव ॥ मगअभ्यासाचाहीहोयअभाव॥ सविकल्पनिर्विकल्पभेदवाव ॥ स्वप्रकाशबोधें ॥ ३१ ॥ आतांसमाधिअभ्यासाचफळजाण ॥ निजात्मबोधेंगळेदेहाभिमान ॥ मगपूर्णतन्मयजेथेंजायमन ॥ समाधिचतेथें ॥ ३२ ॥ कैचेंसविकल्पनिर्विकल्पसाधन ॥ येकार्णवापरीआपलाआपण॥परिच्छेदातीतभेदत्रयशून्य॥सहजस्थिती ॥ ३३ ॥ ऐसाब्रह्मींब्रह्मत्वेंचिसंचला ॥ सविकल्पनिर्विकल्पकायत्याला ॥ इंद्रियेंकोंडितांनकोंडितांनिराळा ॥ प्रपंचाहूनि ॥ ३४ ॥ सविकल्पेंहोयनाअज्ञानी॥ जोनिर्विकल्पेंनव्हेज्ञानी ॥ दोहींसमाधीनेंलाभहानी ॥ नाहींचतया ॥ ३५ ॥ जोकेवळब्रह्मचीजालाआपण ॥ तोकर्मींवर्ततांनवर्ततांजाण ॥ मिथ्यादेहादिप्रपंचाविहीन ॥ सहजचि ॥ ३६ ॥ जोजागृतहोऊनियाबैसला॥तोकायदेखेलमिथ्यास्वप्नाला ॥ तैसाअपरोक्षात्मकस्थितिपावला ॥ त्यासकांहींनदिसे ॥ ३७ ॥ निजात्मअपरोक्षस्थितिनिश्चयें ॥ देहादिप्रपंचींमिथ्याप्रतीतिहोय ॥ सविकल्पनिर्विकल्पसमाधिद्वय ॥ कैंचेंतेव्हां ॥ ३८ ॥ बाधितानुवृत्तीचेसरतीसंकल्प॥ आकळल्यानि

विकल्पनिजात्मरूप ॥ साधनदृष्टीसविकल्पनिर्विकल्प ॥ भासतीतेव्हां ॥ ३९ ॥
निःशेषविसरलादेहाभिमान ॥ जेव्हांसकलहीजालाआत्माचिद्घन ॥ तंवकोणपहा
वाअनात्माकोण ॥ कोंदेपरमानंद ॥ ४० ॥ समाधिविक्षेपसाक्षित्वानुसंधान ॥ स
हजनिरालंबताबाणेपूर्ण ॥ आणिअवरोधावांचूनियाप्राण ॥ स्थिरहोय ॥ ४१ ॥
चित्तहीनिश्चळअवलंबाविण ॥ आणिदृष्टिहीज्याचीदृश्याविहीन ॥ तोचियेकत्रैलो
क्यींधन्य ॥ सर्वोत्कृष्ट ॥ ४२ ॥ जेव्हांसर्वदृष्टिचजालीमायामय ॥ तेव्हांस
र्वोत्कृष्टताहीमिथ्याहोय ॥ ऐसीनिर्विकल्पस्वरूपदशास्वयें ॥ पावलाजो ॥ ४३ ॥
तोब्रह्मानंदेंडुलतसेअखंडित ॥ जाणनिश्चयेंहाचिमुख्यशक्तिपात ॥ बंधमोक्षपुण्य
पापसुखदुःखातीत ॥ भोगीसहजसमाधि ॥ ४४ ॥ जोनिजात्मरूपींजाला
जागृत ॥ तयासीदेहादिसर्वस्वप्नवत् ॥ समाधिव्युत्थानताटस्थतेसहित ॥ गि
लूनिठेला ॥ ४५ ॥ समाधिव्युत्थानअवस्थाऽपक्कासी ॥ परंतुहेसर्वथाघडेनापूर्णा
सी ॥ स्वरूपावेगळेंकांहींचतयासी ॥ उरलेंनाहीं ॥ ४६ ॥ निरसलीअविद्यादेह
बुद्धि ॥ कैंचीबाध्यबाधकउपाधि ॥ याचिनांवेंसहजसमाधि ॥ बोलतांचालतां
॥ ४७ ॥ तोचिकर्मकरूनिअकर्ता ॥ भोगभोगूनिअभोक्ता ॥ ऐसीलाधलीजीवन्मु
क्तता ॥ तोराजयोगी ॥ ४८ ॥ देहप्रारब्धकरोसर्वव्यवहार ॥ अथवासमाधिस्थबै

सोनिरंतर ॥ परंतुनिजात्मस्थितीसीअंतर ॥ नपडेसर्वथा ॥ ४९ ॥ ज्याज्याकांहीं
देहींअवस्थाहोती ॥ त्याइतरांच्यादृष्टीसदिसती ॥ पूर्णासीनाहींचदुसरीप्रतिती ॥
आत्मस्थितीविना ॥ ५० ॥ सहजसमाधितोचिआत्मसाक्षात्कार ॥ गोसावीनंद
नासांगेनप्रकारांतर ॥ ऐसेंसद्गुरुगोपालाश्रमगणेश्वर ॥ वदलाकृपेनें ॥ ५१ ॥
येथेंसंपलेंअष्टादशप्रकरण ॥ जेथेंसमाधिलक्षणनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावी
नंदन ॥ यथामतीं ॥ ५२ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे गणेशगोसावीनंदनसंवादे अ
ष्टादशप्रकरणंसमाप्तम् ॥ श्रीरामार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥
श्रीरामायनमः ॥ ज्याच्यावाक्येंहोयसाक्षात्कार ॥ तेणेंनिरसेंसर्वहीसंसार ॥ ऐसा
गोपालाश्रमरूपीगणेश्वर ॥ सद्गुरूतो ॥ १ ॥ म्हणेगोसावीनंदनाएकाग्रचित्तें ॥
आईकआत्मसाक्षात्कारलक्षणातें ॥ तेणेंकरूनियापूर्णब्रह्मानंदातें ॥ पावशील॥२॥
तिरस्कारूनियासकलिक ॥ विजातीयप्रपंचदेहादिक ॥ जेंनिजात्मरूपब्रह्मयेक ॥
तेथेंवृत्तिनिक्षेपणें ॥ ३ ॥ ब्रह्मध्येयआणिध्याताआपण ॥ हेंद्वैतविसरूनिसावधपणें॥
सुखरूपआत्मत्वींस्थितिराखणें ॥ तोचिसाक्षात्कार ॥ ४ ॥ चरमांतःकरणवृत्तीनें ॥
आत्मरूपसाक्षात्करणें ॥ त्याजलानिश्चयेंम्हणणें ॥ साक्षात्कार ॥ ५ ॥ जिचेनि
बाणेअपरोक्षस्थिति ॥ जीअज्ञाननाशकशेवटीलवृत्ति ॥ तिजलाचरमवृत्तिऐसेंम्हण

ती ॥ सत्त्वांशेंउपजे ॥ ६ ॥ चरमवृत्तीचेंहीसांगूलक्षण ॥ देहादिप्रपंचाचेंहोतांनिरसन॥मीसाक्षीचिद्रूपऐसीस्थितिजाण॥तेचरमवृत्ति ॥७॥ मीब्रह्मऐसीचिवृत्तिअखंडित॥तेचिचरमवृत्तिजाणिजेनिश्चित ॥ जेतत्काळकरितसेउपहत ॥ अज्ञानासी ॥८॥ तेचरमवृत्तिचित्प्रतिबिंबसहित ॥ जेंप्रत्यक्अभिन्नपरब्रह्मअज्ञात ॥ त्याजलाविषयकरूनिनिश्चित ॥ असेकैसी ॥ ९ ॥ मगतद्गतजेंअज्ञानकेवल ॥ त्याचाबाधकरितसेतत्काळ ॥ अज्ञानबाधल्यातत्कार्यसकळ ॥ सहजबाधित ॥ १० ॥ जैसेंतंतुदाहेंपटाचेंदहन ॥ तैसेंअज्ञाननाशेंतत्कार्यनाशन॥ तदंतर्भूतजीचरमवृत्तिजाण॥ मगतीहीउपशमे ॥११॥ तेव्हांजेंपरब्रह्मस्वप्रकाशमान ॥ प्रत्यक्अभिन्ननिजकारण ॥ तेथेंवृत्तिप्रतिबिंबचैतन्य ॥ तेंहिहरपे ॥ १२ ॥ जैसीदीपप्रभाआदित्यप्रभेतें ॥ नभासूनिस्वयेंपावेपराभवातें ॥ तैसेंप्रतिबिंबींचैतन्यअभावातें॥ पावेस्वकारणीं॥१३॥ उपाधिभूतवृत्तिनाशहोतां ॥ मिळेस्वकारणींचित्प्रतिबिंबता ॥ प्रत्यक्अभिन्नपरब्रह्मता ॥ सिद्धचिपावे ॥ १४ ॥ जैसेंमुखापुढेंदर्पणधरितां॥ दुसरेंप्रतिबिंबभासेतत्त्वतां ॥ दर्पणाभावेंमुखप्रतिबिंबता ॥ मुखमात्रत्वेंपावे ॥ १५ ॥ तैसेंवृत्तिअभावेंजेंचित्प्रतिबिंबत्व ॥ तेंपावेप्रत्यक्अभिन्नब्रह्ममात्रत्व ॥ ऐसेंस्वानुभवेंचिजाणावेंनिजतत्त्व ॥ तोचिसाक्षात्कार ॥ १६ ॥ ऐसाजोपरब्रह्मसाक्षात्कार॥ तेथेंवृत्तिव्याप्य

त्वअंगीकार ॥ फळव्याप्यत्वाचातिरस्कार ॥ तेंहोसागूं ॥ १७ ॥ जेंघटपटादिपदा
र्थज्ञातृत्व ॥ तेथेंमुख्यकारणफलव्याप्यत्व ॥ ब्रह्मसाक्षात्कारींवृत्तिव्याप्यत्व ॥ फ
ळव्याप्यत्वनसे ॥ १८ ॥ चित्प्रतिबिंबयुक्तअसतांवृत्ति ॥ त्यासीफलव्याप्यत्वऐसें
म्हणती ॥ दोहींचेंकार्यतेंहीबरवेरीतीं ॥ एकआतां ॥ १९ ॥ विषयकरूनिअज्ञान
घटासी ॥ आपणघटाकारहोतसेकैसी ॥ जेंघटगतअज्ञानत्यासीनिरसी ॥ हेंका
र्यवृत्तीचें ॥ २० ॥ जडपदार्थालाभासवीपूर्ण ॥ हाघटऐसेंजेंहोयज्ञान ॥ तेंचित्प्र
तिबिंबाचेंकार्यजाण ॥ निश्चयेंसी ॥ २१ ॥ वृत्तिघटविषईअज्ञानहरी ॥ हाघटऐ
सेंज्ञानचित्प्रतिबिंबकरी ॥ तेथेंदोन्हींचेंप्रयोजननिर्धारीं ॥ तेंफळव्याप्यत्व॥ २२ ॥
आतांसांगूंवृत्तिव्याप्यत्वलक्षण ॥ तेथेंचित्प्रतिबिंबाचेंनाहींप्रयोजन ॥ वृत्तिमात्र
पाहिजेनासावयाअज्ञान ॥ ब्रह्मसाक्षात्कारीं ॥ २३ ॥ अंधकारांतघटपहावयासी॥
नेत्रआणिदीपपाहिजेनिश्चयेंसी ॥ येकलादीपमात्रदेखावयासी ॥ नेत्रचिअपेक्षित
॥ २४ ॥ अप्रकाशमानघटअंधकारांत ॥ त्यासीप्रकाशीनेत्रआणिदीपनिश्चित ॥
स्वयंप्रकाशमानदीपासीप्रकाशित ॥ नयनमात्र ॥ २५ ॥ तैसेंप्रकाशावयाजडप
दार्थदृश्य ॥ पाहिजेवृत्तिआणिप्रतिबिंबचिदाभास ॥ वृत्तीनेंहोयअज्ञाननिरास ॥
चिदाभासेंदृश्यभासे ॥ २६ ॥ म्हणऊनिचैतन्यस्वप्रकाशमान ॥ तेथेंचिदाभासाचें

नाहींप्रयोजन ॥ ब्रह्मसाक्षात्कारींवृत्तिमात्रअपेक्षणें ॥ अज्ञाननाशार्थ ॥ २७ ॥
ऐसेंफळेंविणचरमवृत्ति ॥ उपजतांसहजअज्ञाननिवृत्ति ॥ होयकेवळआत्मत्वेंब्रह्म
संवितीं ॥ तेथेंचिदाभासनलगे ॥ २८ ॥ मीपरब्रह्मप्रत्यक्अभिन्न ॥ ऐसेंजोंपर्यं
तहोयज्ञान ॥ तोंवरीचिदाभासाचेंप्रयोजन ॥ मगनाहीं ॥ २९ ॥ केवळआपणज्ञा
नघनस्वयें ॥ ऐसाबाणल्यादृढनिश्चय ॥ तेव्हांचिदाभासाचेंकाय ॥ प्रयोजन॥३०॥
जेथेंचरमवृत्तीचाअभाव ॥ तेथेंचिदाभासासीकैंचाठाव ॥ प्रत्यक्अभिन्नस्वयमेव ॥
परब्रह्म ॥ ३१ ॥ ऐसापूर्णआत्मसाक्षात्कारपावतां ॥ नेणेनेणेफलव्याप्यवृत्तिव्या
प्यता ॥ तोचिजीवन्मुक्तजाणतत्त्वतां ॥ केवळब्रह्म ॥ ३२ ॥ जोनिजात्मबोधेंपूर्ण
जालाजागृत ॥ कैचेंदेहादिस्वप्नमिथ्याभूत ॥ सहजचिअसेस्वयेंद्वैतरहित ॥ सच्चि
दानंदमय ॥ ३३ ॥ ऐसासिद्धचिलाधलाआत्मानुभव ॥ मगविरालाजोजाणीवि
नेणीव ॥ देहींअसोनिनाहींदेहभाव ॥ कर्माकर्मातीत ॥ ३४ ॥ ऐसीअखंडस्थिति
बाणावयापूर्ण ॥ मार्गेंम्यातुजसांगितलेंसाधन॥तेंश्रवणमनननिदिध्यासन॥आणिस
माधि ॥ ३५ ॥ गोसावीनंदनाहेंचिनिरूपण ॥ व्यतिरेकान्वयेंकरीश्रवण ॥ सद्गु
रूगोपालाश्रमगजानन ॥ बोलिलाऐसा ॥ ३६ ॥ संपलेंएकोनविंशतिप्रकरण ॥
जेथेंआत्मसाक्षात्कारनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ३७ ॥

इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे गणेशगोसावीनंदनसंवादे एकोनविंशतिप्रकरणं समाप्तम्
श्रीरामायनमः ॥ जोअवलोकितांव्यरिरेकान्वय ॥ येकचिस्वयेंसच्चिदानंदमय ॥
सद्गुरुगोपालाश्रमगणराय ॥ परब्रह्म ॥ १ ॥ म्हणेऐकेगोसावीनंदना ॥ व्यतिरे
कान्वयनिरूपणा ॥ तेणेंकरूनिद्वैतभावना ॥ दूरीहोय॥२॥ सर्वहीनिरासेंउरेब्रह्मचि
न्मय ॥ तयासीव्यतिरेकम्हणतीनिश्चयें ॥ तेंचिसकलांठाईअनुस्यूतस्वयें ॥ तोचि
अन्वय ॥ ३ ॥ जेंकारणयेकउरेकार्याविण ॥ म्हणिजेजेथनसेमिथ्याद्वैतभान ॥ जै
सेंतरंगांतीलयेकलेंजीवन ॥ तोचिव्यतिरेक ॥ ४ ॥ जेंकार्याच्याठाईकारणअभि
न्न ॥ जैसेंअलंकारींअनुस्यूतसवर्ण ॥ हेंचिमुख्यअसेअन्वयाचेंलक्षण ॥ जाणबा
पा ॥ ५ ॥ व्यतिरेकेंब्रह्मींविश्वनदेखणें ॥ अन्वयेंविश्वींब्रह्मअनुस्यूतपाहणें ॥ व्य
तिरेकआणिअन्वयबोधसाधणें ॥ याप्रकारीं ॥६ ॥ आणिकयेकप्रकारांतरयुक्तीनें॥
सांगतोंव्यतिरेकान्वयाचेंलक्षण ॥ तेणेंकरूनियापूर्णसमाधान ॥ पावशील ॥ ७॥
स्वप्नकालींस्थूलदेहाचेंनसणें ॥ त्याजलाचिव्यतिरेकऐसेंम्हणणें ॥ आणिआत्म्या
चेंस्वप्नसाक्षित्वेंअसणें ॥ तेचिअन्वय ॥ ८ ॥ सुषुप्तीकालींनसणेंलिंगदेहाचें ॥ तें
चिलक्षणजाणिजेव्यतिरेकाचें॥सुषुप्तीसाक्षित्वेंअसणेंआत्म्याचें ॥ अन्वयतोचि ॥९॥
समाधिम्हणिजेस्वरूपत्वेंअवस्थान ॥ तेकालींव्यतिरेकेंसुषुप्तीचेंनसणें ॥ आणिआ

त्म्याचेंस्वप्रकाशत्वेंअसणें ॥ तोचिअन्वय ॥ १० ॥ यापरीव्यतिरेकशरीरत्रयाचा ॥ आणिकेवलअन्वयतोआत्म्याचा ॥ देहत्रयनसतांआहेसाचा ॥ ऐसेंसिद्धजालें ॥ ११ ॥ आत्मातोचिब्रह्मसच्चिदानंदमय ॥ दोहींचेंलक्षणयेकहानिश्चय ॥ मगजीवब्रह्मयांसीभेदकाय ॥ व्यतिरेकान्वयें ॥ १२ ॥ व्यतिरेकेंआत्माअवस्थात्रयातीत ॥ अन्वयेंअवस्थात्रयींआत्माअनुस्यूत ॥ ऐशाव्यतिरेकान्वयबोधेंमिथ्याद्वैत ॥ कैंचेंमग ॥ १३ ॥ आणिकयेकतुजलासविस्तर ॥ सांगेनव्यतिरेकाचाप्रकार ॥ मगअंतरींसंशयाचाअंकुर ॥ उपजेना ॥ १४ ॥ आधींव्यतिरेकेंकरूनितुजला ॥ बोधवीननिजात्मस्वरूपाला ॥ मगतूंसिद्धचिजीवन्मुक्ततेला ॥ पावसील ॥ १५ ॥ देहबुद्धिअविद्यासांडिजे ॥ मिथ्याद्वैतभेदातेंगाळिजे ॥ मगस्वयेंचिन्मात्रउरिजे ॥ यानांवेंव्यतिरेक ॥ १६ ॥ स्थूललिंगदेहजडदृश्य ॥ माझेंम्हणतोंमीस्वप्रकाश ॥ केवलज्ञानमयनिर्विशेष ॥ अभिन्नपणें ॥ १७ ॥ देहद्वयाचेंजाणतेंजेंज्ञान ॥ तेंचमीऐसियाअनुसंधानें ॥ देहात्मबुद्धीतेंनिरसणें ॥ मगभासेसर्वमिथ्या ॥ १८ ॥ देहेंद्रियविषयआणिमनादिक ॥ यासकलांचेंजेंपूर्णप्रकाशक ॥ तेंज्ञानमयस्वरूपनिरूपाधिक॥निवडूनिध्यावें॥१९॥श्रवणेंज्याशब्दाचेंकीजेग्रहण॥तोशब्दआणित्याशब्दाचेंज्ञान॥तेंचिनिजात्मरूपचैतन्यघन॥साक्षीमात्र ॥२०॥ नेत्रेंकरोनिरूपअवलोकणें॥ज्या

ज्ञानेंरूपपरिच्छिन्नजाणणें ॥ तेंचिनिजात्मरूपचैतन्यघन॥ साक्षीमात्र॥२१॥तैसेंत्व
गिंद्रियेंकरूनिस्पर्शघेणें ॥ शीतोष्णमृदुकठिणकळेज्याज्ञानें ॥ तेंचि० ॥ २२ ॥ तै
सेंचिजिव्हेंद्रियेंरसचाखणें ॥ मधुरकटूम्लादिकजेंज्ञान ॥ तेंचि० ॥ २३ ॥ सुगंधदु
र्गंधप्रतीतिजाण ॥ घ्राणासोहोतसेतयाचेंज्ञान ॥ तेंचि० ॥ २४ ॥ ज्याज्ञानेंवाचेनें
शब्दबोलणें ॥ जयाज्ञानेंहस्तानेंदेणेंघेणें ॥ तेंचि०॥२५॥ ज्याज्ञानेंआधींमार्गवोळ
खणें ॥ मगचरणेंकरूनिचालणें ॥ तेंचि०॥ २६ ॥ जेणेंपायूचेंविसर्गकर्मजाणणें ॥
आणिउपस्थींआनंदअनुभवणें ॥ तेंचि० ॥ २७ ॥ ज्याज्ञानेंसंकल्पविकल्पकरी
मन ॥ ज्याज्ञानेंबुद्धीलानिश्चयींप्रवर्तणें ॥ तेंचि० ॥ २८ ॥ ज्याज्ञानेंकीजेअनुसं
धान ॥ ज्याज्ञानेंअहंकारधरीअभिमान ॥ तेंचिनिजात्मरूपचैतन्यघन ॥ साक्षीमा
त्र ॥ २९ ॥ सर्वेंद्रियव्यापरींचालकमन ॥ असेंभासेपाहतांदृष्टीनें ॥ परंतुमनाचा
हीप्रकाशकपूर्ण ॥ साक्षीआत्मा ॥ ३० ॥ साक्षीआत्मासूक्ष्मदृष्टीनेंनपाहती ॥ ते
णेंजन्ममरणावर्तींपडती ॥ तोचिअपरोक्षजाणतांभवभ्रांति ॥ कैंचीमग ॥ ३१॥ या
लागींआत्मासाक्षीजोत्यासीजाणावें ॥ सहजपरमानंदींनिमग्नव्हावें ॥ म्हणोनि
याआधींअवलोकावें ॥ व्यतिरेकें ॥ ३२ ॥ मनसाह्यतेव्हांचेष्टतीइंद्रियें ॥ मगबु
द्धिकरितसेनिश्चय ॥ सहजप्रकाशतीसकलविषय॥ पदार्थांते ॥ ३३ ॥ जीवजोम

नबुध्यादिकांसीजाणता ॥ त्याजीवासहितसर्वप्रकाशिता ॥ तोचिकेवलआत्मासा
क्षीतत्त्वतां ॥ परब्रह्म ॥ ३४॥इंद्रियेंविषयमनबुद्धिजीव॥यासर्वांसीजाणेतोसाक्षीस्व
यमेव ॥ सच्चिदानंदमयतेथेंअभाव ॥ मिथ्याद्वैताचा ॥ ३५ ॥ येकेकालींम्हणतांइ
तुकियाला ॥ सहजमीतयांहूनिनिराळा ॥ ऐसाजोनिश्चयव्यतिरेकतयाला ॥ म्ह
णताती ॥ ३६ ॥ आणिकएकव्यतिरेकाचीयुक्तिसांगेन ॥जेणेंसिद्धचिपाविजेनिजा
त्मखुण ॥ यास्तवएकाग्रताकरूनियामन ॥ परिसावें ॥ ३७ ॥ श्रवणेंऐकिजेत्व
चेनेंस्पर्शिजे ॥ नेत्रानेंदेखिजेजिव्हेनेंचाखिजे ॥ घ्राणेंकरूनियागंधघेईजे ॥ तेंदृश्य
मीनव्हें ॥ ३८ ॥ वाचेंबोलिजेहस्तेंघेइजेदेइजे ॥ चरणेंचालिजेपायूनेंविसर्गकीजे॥
गुह्येंकरूनियाआनंदभोगिजे ॥ तेंदृश्यमीनव्हें ॥ ३९ ॥ मनेंकल्पिजेबुद्धीनेंनिश्चय
कीजे ॥ चित्तानेंजेंअनुसंधानधरिजे ॥ अहंकारेंअभिमानींप्रवर्तिजें ॥ तेंदृश्यमीन
व्हें ॥ ४० ॥ ऐसेंमनादिसकलहीजाणिजे ॥ जेंस्वप्रकाशेंकरूनिप्रकाशिजे॥ तयां
सीसहजचिद्दृश्यम्हणिजे ॥ त्याहूनमीभिन्न ॥ ४१ ॥ माझ्याठाईंनाहींमिथ्यादृश्य
भान ॥ मीआत्मासकलांहूनिविलक्षण ॥ ऐसाचिन्मात्रबोधतोचिजाण ॥ व्यतिरे
क ॥ ४२ ॥ इंद्रियविषयअवस्थातिन्ही ॥ जेविश्वतैजसप्राज्ञअभिमानी ॥ जोके
लाबाल्यत्वींतारुण्यींवृद्धपणीं ॥ व्यवहार ॥४३॥ हेंसर्वहीयेक्याचसमयानें ॥ जो

जाणतसेयेकलाआपण ॥ तोमीआत्माकेवलज्ञानघन ॥ सकलांरहित ॥ ४४ ॥
यापरीजोनिजात्मबोधहोय ॥ तोचिव्यतिरेकजाणतांनिश्चय ॥ तैसाचयापुढेंअन्वय॥
निरूपिजेल ॥ ४५ ॥ सर्वांचाव्यतिरेकजाल्यापूर्ण ॥ उरेकेवळआत्माज्ञानघन ॥
तयांहूनिदृश्यनाहींचभिन्न ॥ दुजेपण ॥ ४६ ॥ जेंसकलहीविश्वचराचर ॥ भ्रम
मात्रभासेदृश्याकार ॥ तयाचेंअधिष्ठानचिसार ॥ चैतन्यघन ॥ ४७ ॥ दृश्याधि
ष्ठानचैतन्याचेंआवरण ॥ तेदृश्याकारवृत्तिअज्ञानजन्य ॥ तियेच्यानाशेंदृश्यदृष्टचै
तन्य ॥ समरसती ॥ ४८ ॥ विचारितांचैतन्ययेकचिअसे ॥ तेंद्विधाअंतर्बाह्यवृत्ति
योगेंभासे ॥ ऐसियाबोधेंमिथ्याद्वैतनिरसे ॥ तोचिअन्वय ॥ ४९ ॥ जेंदृश्यप
दार्थींचैतन्यअसे ॥ तेंइंद्रियवृत्तिमाजींविलसे ॥ दोन्हीचैतन्यमिळतांनभासे ॥
मृगजलवत् ॥ ५० ॥ जेजेकांहींदृश्यपदार्थसमस्त ॥ केवलमिथ्यामृगजल
वत् ॥ तयाचेंअधिष्ठानयेकशाश्वत ॥ चैतन्यचि ॥ ५१ ॥ पदार्थआणिज्याइं
द्रियांच्यावृत्ती ॥ दोन्हीजडअप्रकाशत्वेंअसती ॥ उभयतांतकेवलचैतन्यज्यो
ति ॥ अनुस्यूत ॥ ५२ ॥ जडदृश्यपदार्थींचैतन्यवसतें ॥ तरीदृश्याचेंभान
नाहींनहोतें ॥ तरीवृत्तिमाजींचैतन्यनवसतें ॥ तेव्हांनभासवीदृश्य ॥५३ ॥ एवंचैत
न्यालाप्रकाशीचैतन्य ॥ जडातेंजडनप्रकाशीजाण ॥ ऐसेंअसतांमध्येंभासेभ्रांतीनें॥

अन्यसकळ ॥ ५४ ॥ ज्ञेयआणितयाचेंज्ञान ॥ दोहींलाजाणेतोज्ञाताआपण ॥ ऐसेंत्रिपुटीशब्दमात्रजाण ॥ अवघेंचैतन्य ॥ ५५ ॥ ज्ञाताज्ञानआणिज्ञेय ॥ त्रिपुटीकेवळचिन्मय ॥ ऐसाबाणतांअन्वय ॥ भेदकैंचा ॥ ५६ ॥ नानाचित्रेंपरीभिंतअसेयेक ॥ नानाअलंकारींयेकचिकनक ॥ पटींचौकड्यादिसतातीअनेक ॥ तेथेंतंतूयेकपें ॥ ५७ ॥ तैसेंजरीभासेनानादृश्याकार ॥ परीतेंब्रह्मचियेकसाचार ॥ सर्वींसर्वपणेंजेंनिर्विकार ॥ सच्चिदानंदघन ॥ ५८ ॥ ऐशाअन्वयेंकरूनिअवलोकितां ॥ मगमिथ्याभेदनिरसेतत्त्वतां ॥ ब्रह्मयेकतेथेंभासेअनेकता ॥ तेंचिअज्ञान ॥ ५९ ॥ अविचारेंभेदनसताभासे ॥ विचारेंपहातांकांहींचनसे ॥ म्हणऊनिजोंवरीअज्ञानअसे ॥ तोंवरीभेद ॥ ६० ॥ ब्रह्मअद्वैतसच्चिदानंदघन ॥ तेथेंभेदभासेअज्ञानउपाधीनें ॥ उपाधिनिरसल्याकैंचेंभेदभान ॥ मिथ्याभूत ॥ ६१ ॥ म्हणऊनिभेदातेंसांडिजे ॥ केवळयेकात्मतासाधिजे ॥ त्याजलाचिअन्वयम्हणिजे ॥ निश्चयेंसी ॥ ६२ ॥ जोमीआत्माकेवळज्ञानघन ॥ त्यामाझ्याठाईंसकलनिर्माण ॥ आतांमजहूनिनाहींभिन्न॥भुवनत्रयीं॥६३॥मीपंचभूतदेवब्रह्मादिक॥जेंसकलविश्वनामरूपात्मक॥त्याचेंकर्मतेंहीतद्रूपेंमीचयेक॥करितसें॥ ६४ ॥मीपरब्रह्मयेकचिदाकार॥सर्वात्मकअखंडनिर्विकार॥ऐसाबाणेपूर्णबोधसाचार॥तोचिअन्वय॥६५॥ऐसाव्यतिरेकान्वयेंबो

धसाधिजे ॥ मगसहजद्वैतपणासमुकिजे ॥ जाणजीवन्मुक्तिनिश्चयेंसीबोलिजे ॥
याचिनांवें ॥ ६६ ॥ व्यतिरेकान्वयबोधाविण ॥ सर्वथानपाविजेसमाधान ॥ पूर्ण
जाणतीसंतहेखुण ॥ स्वानुभवें ॥ ६७ ॥ व्यतिरेकान्वयबोधजयाबाणला ॥ तोचि
पूर्णब्रह्मानंदींसमरसला ॥ भवबंधनापासूनिमुक्तजाला ॥ सहजचि ॥ ६८ ॥ गो
सावीनंदनाहेचिअद्वैतस्थिति ॥ प्रकारांतरेंबोधवीनमागुतीं ॥ सद्गुरूगोपालाश्रमग
णपती ॥ ऐसाबोलिला॥६९॥ऐकूनिसद्गुरूचेंवचन ॥ ब्रह्मानंदेंडोलेगोसावीनंदन ॥
मगसप्रेमेंकरीसाष्टांगनमन ॥ वारंवार ॥ ७० ॥ येथेंसंपलेंविंशतिप्रकरण ॥
जेथेंव्यतिरेकान्वयनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ७१ ॥
इतिश्रीज्ञानमोदकग्रंथे० विंशतिप्रकरणं ॥ समाप्तम् ॥ ॥ ॥
श्रीरामायनमः ॥ केवलसच्चिदानंदब्रह्मअद्वैत ॥ निर्विकारअखंडशुद्धशाश्वत ॥ स
द्गुरुगोपालाश्रमरूपीभगवंत ॥ मंगळमूर्ति ॥ १ ॥म्हणेगोसावीनंदनासावधचित्तें॥
ऐकअद्वैतबोधनिरूपणातें ॥ तेणेंकरूनिसिद्धजीवन्मुक्तीतें ॥ पावशील ॥ २ ॥ मी
आत्मादेहेंद्रियादिरहित ॥ असंगचिन्मात्रशुद्धशाश्वत ॥ ऐसाभावतोचिजाणनि
श्चित ॥ साक्षीबोध ॥ ३ ॥ ऐसियासाक्षीबोधेंचिकेवळ ॥ मिथ्यात्वनभासेदृश्यसक
ळ ॥ म्हणऊनियासाधिजेनिर्मळ ॥ सर्वाधिष्ठानींबोध ॥ ४ ॥ जोसाक्षीतोचिब्र

ह्माधिष्ठान ॥ ऐशाबोधेंअद्वयत्वबाणेपूर्ण ॥ मगमिथ्यात्वसकलदृश्यभान ॥
निश्चयेंसी ॥ ५ ॥ पडल्यासाक्षीबोधाच्याप्रवाहीं ॥ दृश्यींमिथ्यात्वनिश्च
यबाणेकांहीं ॥ सर्वाधिष्ठानब्रह्माद्वयबोधनाहीं ॥ पूर्णजोंवरी ॥ ६ ॥ अहं
पणअपरोक्षत्वनिरसलें ॥ साक्षीबोधेंब्रह्मपरोक्षत्वकळलें ॥ तेंहिपूर्णैक्यबोधा
वेगळें ॥ अद्वयत्वनबाणे ॥ ७ ॥ निजबुद्ध्यादिदेहोपाधिअपरोक्ष ॥ ईश्वरमाया
दिकविश्वोपाधिपरोक्ष ॥ दोहींच्याअभावेंसहजशुद्धलक्ष्य ॥ अद्वयब्रह्म ॥ ८ ॥
परोक्षापरोक्षचैतन्यद्वैत ॥ अधिष्ठानींअसेमिथ्याकल्पित ॥ ब्रह्मअद्वयपणेंअखंडि
त ॥सच्चिदानंदमय ॥९॥ब्रह्मींपरोक्षसापेक्षअसेपूर्णत्व॥ आणिअपरोक्षसापेक्षसाक्षि
त्व ॥ परोक्षापरोक्षबोधेंअद्वैतत्व ॥ सिद्धचिसाधे ॥ १० ॥ जेंसाक्षीचैतन्यतेंचि
असेब्रह्मपूर्ण ॥ मिथ्याद्वैतपरोक्षापरोक्षउपाधीनें ॥ यास्तवशुद्धशबलपदार्थशोधन॥
कीजेमहावाक्यें ॥ ११ ॥ वाक्यलक्ष्यार्थबोधरूपजीवृत्ति ॥ मीब्रह्मऐसीहोतसेप्रती
ति ॥ तिजलाशुद्धचरमम्हणताती ॥ निश्चयेंसी ॥ १२ ॥ निरसीब्रह्मविषईकअ
ज्ञान ॥मगतत्कार्यदेहादिदृश्यजाण ॥ तेंप्रातिभासिकमिथ्याबाधितपणें ॥ सहज
चि ॥ १३ ॥ ऐसीब्रह्मपरजेचरमवृत्ति ॥ तियेचीहीहोतसेनिवृत्ति ॥ मगस्वप्रकाश
त्वेंसहजस्थिति ॥ अनिर्वाच्य ॥ १४ ॥ जेथेंस्वानुभवप्रतीतीचाक्षय ॥ ब्रह्मसर्वात्म

कऐसोस्थितिहोय ॥ तेचिबाधितानुवृत्तिनिश्चय ॥ अद्वयत्वें ॥ १५ ॥ मीब्रह्मऐसी
चरमवृत्तिनाशे ॥ मगतेबाधितानुवृत्तिविलसे ॥ सर्वात्मकब्रह्मस्थितिप्रकाशे ॥
अद्वयपणें ॥ १६ ॥ विवेकेंपाहतांद्वैतनसे ॥ सर्वात्मकब्रह्मचियेकअसे ॥ मिथ्याना
मरूपादिकजेंभासे ॥ तेंअविवेकें ॥ १७ ॥ नानाअलंकारींयेकचिकनक ॥ नानातरं
गींयेकचिउदक ॥ तैसेंयेकचिदानंदसर्वात्मक ॥ परब्रह्म ॥ १८ ॥ नानाअवयवींये
कचिशरीर ॥ नानाशाखायेकचितरुवर ॥ तैसेंयेकसर्वात्मकनिर्विकार ॥ परब्रह्म
मी ॥ १९ ॥ जरीभासतीवृतकणिकाअनेक ॥ परीवृतावांचूनिदुजेंनाहींआणीक॥
तैसेंयेकसच्चिदानंदसर्वात्मक ॥ परब्रह्ममी ॥ २० ॥ ऐसाअद्वैतबोधज्याबाणला ॥
तोचिजीवन्मुक्तजगींभला ॥ ब्रह्मानंदेंतृप्तहोऊनियाठेला ॥ अखंडित ॥२१ ॥ मग
कैंचेंद्वैतकैंचेंअद्वैतपण ॥ जोकेवलआपेआपचैतन्यघन ॥ त्यासीविवेकेंवैराग्यादिक
साधनें ॥ कासयासी ॥ २२ ॥ जोभूतभविष्यवर्तमानाला ॥ आणिधर्मअर्थकाम
मोक्षाला ॥ देशकालवस्तुपरिच्छेदाला ॥ विसरला ॥ २३ ॥ आत्मानात्मआणि
शुभाशुभ ॥ चिंताचिंतालाभालाभ ॥ हेंकांहींचनेणेजोस्वयंभ ॥ सहजस्थिति॥२४॥
सुषुप्तिस्वप्नजागरण ॥ तुर्याआणिभयादिकजाण ॥ त्याचेंकांहींचनाहींभान ॥ ज्ञा
नियाला ॥ २५ ॥ दुसरेंसमीपबाह्यांतर ॥ आणिस्थूलसूक्ष्माकार ॥ हेंनजाणेजो

ज्ञानीव्याप्तनिर्विकार ॥ पूर्णपणें ॥ २६ ॥ जोसद्रूपेंपूर्णसंचलाआपण ॥ तयासी
कैंचेंजन्मआणिमरण ॥ लोकलौकिकसमाधिउत्थान ॥ तेंहीनाहीं ॥ २७ ॥ अना
दिजडाजडगोंवाउगवला ॥ अंतरींचासकलसंशयफिटला ॥ त्रिविधकर्मापासूनिया
मुक्तजाला ॥ ज्ञानियातो ॥ २८ ॥ ऐसेंकृपेनेंबोलिलावचन ॥ सद्गुरूगोपालाश्रम
गजानन ॥ ऐकोनिविनवीगोसावीनंदन ॥ देवाप्रति ॥ २९ ॥ कैसाअसेजडाजड
गोंवा ॥ आणिसंशयतोहीसांगावा ॥ त्रिविधकर्माचाअभावबरवा ॥ कीजेअवग
त ॥ ३० ॥ ऐसेंबोलोनिकेलेंसाष्टांगनमन ॥ तेणेंसंतोषलासद्गुरूगजानन ॥ म्हणे
गोसावीनंदनातुझाप्रश्न ॥ सांगेनआतां ॥ ३१ ॥ संपलेंयेकविंशतिप्रकरण ॥ जेथें
अद्वैतलक्षणनिरूपण ॥ तेंचिबोलिलागोसावीनंदन ॥ यथामतीं ॥ ३२ ॥ इतिश्री
ज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसावीनंदनसिंदखेडकरसंवादेअद्वैतनिरूपणंनामएकविंशति
प्रकरणं समाप्तम् ॥ रामचंद्रार्पणमस्तु ॥शुभंभवतु ॥ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ साक्षात्ब्रम्हणस्पतिरूप ॥ गोपाळाश्रमस्वरूप ॥ निर्विकारस
च्चिदानंदरूप ॥ मंगलमूर्ति ॥ १ ॥ आतांगोसावीनंदनाऐक ॥ जडाजडगोंव्या
चेंसम्यक् ॥ त्याचेंस्वरूपलक्षणविवेक ॥ चित्तींअवधारिजे ॥ २ ॥ जडहोयप्रपंच
दृश्य ॥ अजडशुद्धमायाअदृश्य ॥ उभयतांचाकरूनिनिरास ॥ ब्रम्हैक्यता ॥ ३ ॥

देहेंद्रियवृत्तीकरून ॥ जडाचेंहोयज्ञान ॥ सत्त्वशुद्धवृत्तीकरून॥अजडलक्षणस्पष्टहो
य ॥ ४ ॥ दोहींहूनजेंविलक्षण ॥ साक्षात्चिन्मयप्रमाण ॥ तेंचिसच्चिदानंदघन ॥
निबिडदाटयेकचि ॥ ५ ॥ जडगोंव्यासलागेअज्ञानी ॥ अजडलक्षणकरीज्ञानी ॥
उभयतांहूनिकरीविलक्षण ॥ तेंचिचिन्मय ॥ ६ ॥ जडाजडगोंव्याचापसारा ॥ त्या
चामुळींचनाहींथारा ॥ अध्यस्तहोऊनिघरा ॥ नाहींतेंदावी ॥ ७ ॥ ब्रह्मींजडाजड
गोंवाचनाहीं ॥ हानिश्चयचिन्मयत्वेंपाही ॥ गोसावीनंदनातूंचिसर्वही ॥ विलसला
सी ॥ ८ ॥ असोहेंजडाजडगोंव्याचेंलक्षण ॥ तुजकेलेंसंक्षेपेंनिरूपण ॥ आतांत्रि
विधकर्माचेंलक्षण ॥ सांगिजेलतेंऐक ॥ ९ ॥ एककर्मदुजेंअकर्म ॥ तिसरेंदुर्धरविक
र्म ॥ यात्रिविधकर्माचेंमर्म ॥ जाणिलेंपाहिजे ॥ १० ॥ जगद्ब्रह्मविलासात्मकतेंचिक
र्म ॥ जेथेंविलासनसेतेंचिअकर्म ॥ तमोगुणवृत्तीनेंहोतेंविकर्म ॥ पापाचरणतें ॥ ११
॥ आतांकर्मींजोलागे ॥ तोचिस्वर्गसुखातेंभोगे ॥ मागुतींजन्मवेगें ॥ धरीगर्भवा
स ॥ १२ ॥ अकर्मवेगाचेंफळ ॥ तेंचिमोक्षाचेंलक्षणकेवळ ॥ हेंचिअकर्माचेंनिर्मळ ॥
स्वरूपनिरूपिलें ॥ १३ ॥ विकर्मानेंहोयनरक ॥ नानायातनादेख ॥ लवलेशहीसु
ख ॥ तेथेंनाहीं ॥ १४ ॥ ऐसेंजेंत्रिविधकर्म ॥ तेंपूर्णयोग्यासीनाहींमर्म ॥ कर्माकर्म
विकर्म ॥ धुवोनिब्रम्हींनिजेला ॥ १५ ॥ संचितक्रियमाणप्रारब्धकर्म ॥ पूर्णयोग्या

सीनाहींतेंअधर्म ॥ ऐसेंगुरुवेदशास्त्राचेंमर्म ॥ जाणिजेबापा ॥ १६ ॥ मुळींदेहचि
नाहीं ॥ तेथेंकर्माकर्मविकर्मतेंकाई ॥ ऐसाउपनिषत्सिद्धांतपाही ॥ निजात्मचक्षूनें
॥ १७ ॥ जोब्रह्मानंदींनिमग्नझाला ॥ तोब्रम्हचिहोऊनिठेला ॥ साक्षान्मंगळमूर्ति
मंगळा ॥ त्यालाम्हणावें ॥ १८ ॥ ऐसेंनिरूपणऐकूनि ॥ गोसावीनंदनतन्मयगजा
ननीं ॥ तदाकारहोऊनि ॥ तोचिझाला ॥ १९ ॥ मगगोपाळाश्रमरूपीगजाननें ॥
सावधकरूनिसमाधीनें ॥ पूर्णस्थितियोगाच्यालक्षणें ॥ गोसावीनंदनपाहेटकटका
॥ २० ॥ गोसावीनंदनाऐक ॥ गुरुपरंपराविवेक ॥ त्याचेंस्वरूपकरूंसम्यक् ॥ ह्म
णजेपूर्णहोसी ॥ २१ ॥ आदितोमुद्गलगुरू ॥ तयापासोनिजहालाऋषेश्वरू ॥ तया
चाशिष्यतोशंकरू ॥ जाणगोसावीनंदना ॥ २२ ॥ शंकरापासोनिवैकुंठनाथ ॥ त्या
पासूनिसूर्यसमर्थ ॥ सूर्यापासोनिदेवीसत्पथ ॥ ऐसेआदिशिष्य ॥ २३ ॥ पुढेंत्या
पासूनिब्रह्मदेव ॥ ब्रम्हदेवापासूनिव्यासशिष्यबरवे ॥ व्यासापासूनिशुकदेव ॥ ज
हालेऐसेअपार ॥ २४ ॥ हीआमुचीगुरुपरंपरा ॥ जाणगोसावीनंदनाशिष्यवरा ॥
हीजाणल्याथारा ॥ ब्रम्हैक्यतेचाहोय ॥ २५ ॥ हाग्रंथज्ञानमोदक ॥ अमृताहूनि
अधिक ॥ अमृततेंक्षुधाउदक ॥ हेंतोपरब्रम्ह ॥ २६ ॥ जेथेंनांदेब्रम्हणस्पतिरूप ॥
तोचिगोसावीनंदनाअमूर्ततूंचिरूप ॥ ऐसाहाग्रंथपरमामृतस्वरूप ॥ भूमंडळींजगउ

द्वरावयाजाहला ॥ २७ ॥ याग्रंथाचाजोकरीलविचार ॥ गुरुमुखेंकरूनिसारासार ॥
तोचिपारपावेलभवसागर ॥ निश्चयेंकरोनि ॥ २८ ॥ येथेंगुरुशिष्यजाहलेमौन ॥ ए
करसतादोघांचीविलक्षण ॥ मौनावलेवेदमुकेपणें ॥ येथेंबोलोंचिनये ॥ २९ ॥ कलि
युगामाजींसार ॥ जडप्राणीभोळेफार॥त्याचीदयाउपजोनिविघ्नहर ॥ करिताझाला
॥ ३० ॥ गोसावीनंदनरूपेंकरून ॥ उपनिषदार्थगहन ॥ प्राकृतमहाराष्ट्रभाषेंकरू
न ॥ रचिताजाहला ॥ ३१ ॥ याग्रंथाच्याअवलोकनेंकरून॥ जेंपूर्णयोगाचेंज्ञान॥ तेंचि
पाविजेपूर्ण ॥ ऐसेंआहे ॥ ३२ ॥ इतिश्रीज्ञानमोदकग्रंथेगणेशगोसावीनंदनसंवादेज
डाजडगोंवानिरूपणंनामद्वाविंशतिप्रकरणंसंपूर्णम् ॥ २२ ॥ अस्यग्रंथस्यपठणेनम
ननेननिदिध्यासनेनगुरुकृपयाचब्रम्हसाक्षात्कारोदृढीभूयात् ॥ ॥ ॥

हें पुस्तक पुणें पेठ शनवार मेहुणपुरा येथें जगद्धितेच्छु छा०छा०
फेब्रुवारी तारीख १ सन १८८७

AUTHOR

TITLE

DATE DUE | BORROWER'S NAME

V 891.461
Gos/Gya
50476

Date Due